RNI 47034/64

# लातूर समाचार
LATUR SAMACHAR
Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

LATUR लातूर वर्ष ३४ वे अंक १३७ वा शनिवार, दिनांक १६ ऑगस्ट २०२५ (सांज. दैनिक) पोस्ट परवाना नं. L2/RNP/OMD-52/24-26 पृष्ठे – ६ मो:९४२२४७२५०२ किंमत १ रुपया

आमच्याकडे सर्व प्रकारचे कॉम्प्युटर, नायलॉन रबरी शिक्के एका तासात तयार करून मिळतील

■ संपर्क ■

जडे ऑफसेट प्रिंटर्स



मित्र नगर, लातूर, फोन : २४२६०८

# पावसाचे जोरदार पुनरागमन

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात पुन्हा एकदा पावसाने जोरदार पुनरागमन केलं आहे. हवामान विभागाने येत्या तीन दिवसांसाठी मध्य महाराष्ट्र, कोकण आणि विदर्भात पावसाचा अंदाज वर्तवला आहे. मुंबई आणि उपनगरातही पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. छत्रपती संभाजीनगर आणि अमरावती जिल्ह्यांतील अनेक भागांमध्ये ढगफुटी सदृश पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून, काही गावांत पूरस्थिती निर्माण झाली आहे. मुसळधार पावसामुळे घरात पाणी शिरले असून, शेतकरी वर्गाला मोठा फटका बसला आहे.

१६ ऑगस्टच्या पहाटेपासून मुंबईमध्ये जोरदार पावसाला सुरुवात झाली. शुक्रवारी रात्री ११ वाजल्यापासून शनिवारी सकाळी ५ वाजेपर्यंत मुसळधार सरी कोसळल्या. यामुळे अनेक सखल भागांत पाणी साचले असून वाहतूक व्यवस्थाही विस्कळीत झाली आहे. आज शहरभर दहीहंडीचा उत्सव साजरा होत असताना पावसामुळे नागरिकांची चिंता वाढली आहे.



## जिल्ह्यात जोरदार पावसाचा इशारा

**हवामान अंदाजानुसार पुढील ३–४ तासांत लातूर, नंदुरबार, जळगाव, हिंगोली, नांदेड, धुळे या जिल्ह्यांत ३०–४० किमी प्रतितास वेगाने वाहणाऱ्या वाऱ्यांसह, विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन लातूर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने केले आहे.**

## मांजरा प्रकल्प धनेगाव

**दि. १६/०८/२०२५ ९:०० वाजता.(३ तासाने )**

**– पाणीपातळी :– ६४१.६५ मी./ ६४२.३७ मी. – एकूण पाणीसाठा दलघमी = १९३.६१३/२२४.०९३ – मृत साठा दलघमी = ४७.१३०/४७.१३० – जिवंत साठा दलघमी =१४६.४८३ /१७६.९६३ – जिवंत पाणीसाठा टक्केवारी : ८२.७८% – पाऊस = ०० मिमी / २७५ मिमी. – आवक दलघमी =५.५६७ / १०७.६८६ – आवक दर = ५१५.४६ क्यूमेक्स / १८२००.९९ क्यूसेक्स**

## निम्न तेरणा प्रकल्प माकणी

माकणी धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील येणारा येवा लक्षात घेऊन पाणी पातळी नियंत्रित करण्याचे दृष्टीने आज दि.१६/०८/२०२५ रोजी ठीक १३:१० वाजता निम्न तेरणा प्रकल्पाचे द्वार क्रं ३,४,६,९,११, व १२(एकूण ६ द्वार) हे बंद करण्यात आले असून तेरणा नदीपात्रात विसर्ग कमी करण्यात आला आहे. सद्यःस्थितीत द्वार क्रं २,१३,७,व ८ ( एकूण ४) ही वक्रद्वारे १० सेंटिमीटर ने चालू असून एकूण १५२२.५६ क्यूसेक्स (४३.११४ क्यूमेक्स) इतका विसर्ग नदीपात्रात चालू आहे. धरणामध्ये येणारी पाण्याची आवक पाहून विसर्ग वाढवणे/कमी करणे बाबत निर्णय घेण्यात येईल. तरी, नदी काठावरील/ पुरामुळे बाधित होणाऱ्या गावातील नागरीकांनी खबरदारी घ्यावी.

## निम्न तेरणा प्रकल्पातून तेरणा नदीपात्रात होणारा विसर्ग कमी

निम्न तेरणा प्रकल्पाचे शनिवारी सकाळी सात वाजता १० दरवाजे १० सेंटीमीटरने उघडण्यात झाले होते. आज दुपारी दीड वाजता यापैकी ६ दरवाजे बंद करण्यात आले असून ४ दरवाज्यातून १५२२.५६ क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू आहे. धरणामध्ये येणारी पाण्याची आवक पाहून विसर्ग वाढविणे अथवा कमी करण्याचा निर्णय घेण्यात येईल, त्यामुळे नदी काठावरील गावांमधील नागरिकांनी खबरदारी घेण्याचे आवाहन प्रशासनामार्फत करण्यात आले आहे. आगामी काळात पावसाचा जोर वाढला जाणार आहे असा अंदाज आहे.

## लातूर पोलिसांच्या सतर्कतेमुळे बालविवाह रोखला

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर तालुक्यातील एका गावात होत असलेला बालविवाह लातूर पोलिसांनी सतर्कता दाखवत मुला–मुलीच्या आई वडिलांचे प्रबोधन करुन रोखला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की दिनांक १४ ऑगस्ट रोजी सकाळी महाराष्ट्र पोलिसांच्या डायल ११२ वर फोन करून एका नागरिकांने लातूर तालुक्यातील १२ नंबर परिसरात बालविवाह होणार असल्यासंदर्भात माहिती लातूर पोलिसांना दिली. त्यावरून डायल ११२ येथील कार्यरत पोलीस अधिकारी/अमलदारांनी तत्परतेने कारवाई करत वरिष्ठांच्या मार्गदर्शनात सदरची माहिती दामिनी व भरोसा सेल च्या पथकाला दिली. त्यावरून भरोसा सेलचे महिला पोलीस उपनिरीक्षक शामल देशमुख व त्यांच्या पथकाने वेळेत सदर ठिकाणी पोहोचून होणारा बालविवाह थांबविला तसेच बालविवाह लावणाऱ्या पालकांना नोटीसा देऊन बालकल्याण समिती समोर हजर राहणे संदर्भात समज दिली आहे.

सजग नागरिकांने डायल ११२ वर दिलेल्या माहितीवरून पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात लातूर पोलिसांच्या भरोसा सेल व दामिनी पथकातील पोलीस उपनिरीक्षक शामल देशमुख, डायल ११२ युनिटचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक विश्वनाथ ढोले, पोलीस अंमलदार, नितीन कोतवाड, चिंतामणी पाचपुते,चित्रा कुंभार, शंकर बुड्डे, चालक पल्लवी चिलगर तसेच सोबत चाइल्ड लाइन चे बापू सूर्यवंशी यांनी अतिशय तत्परतेने कारवाई करून वेळीच बालविवाह रोखला आहे.

## विश्वेश्वरय्या पब्लिक स्कूलमध्ये देशभक्तीच्या जल्लोषात स्वातंत्र्य दिन साजरा



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर येथील विश्वेश्वरय्या पब्लिक स्कूलमध्ये स्वातंत्र्य दिनाचा भव्य आणि उत्साहपूर्ण सोहळा देशभक्तीच्या जल्लोषात पार पडला. मुख्य पाहुण्या म्हणून उपस्थित असलेल्या दिशा प्रतिष्ठानच्या संचालिका ॲड. सौ. वैशालीताई यादव यांच्या हस्ते राष्ट्रीय ध्वजाचे अभिमानाने ध्वजारोहण करण्यात आले. त्यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांना देशासाठी निष्ठा, प्रामाणिकपणा आणि सेवाभाव जोपासण्याचे आवाहन केले.

सोहळ्यानिमित्त प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबद्दल जागरूकता वाढविण्याचा उपक्रम यशस्वी ठरला. तसेच स्वातंत्र्य दिनानिमित्त घेतलेल्या विविध सांस्कृतिक व शैक्षणिक स्पर्धांच्या विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या देशभक्तीपर गीत, कवितावाचन, नृत्य आणि भाषणांनी उपस्थितांचे मन भारावून टाकले. या कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, पालक व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. देशाच्या तिरंग्याखाली विद्यार्थ्यांच्या डोळ्यातील चमक आणि गीतातील जोश पाहून उपस्थितांना जाणवले की–स्वातंत्र्याचा खरा उत्सव म्हणजे देशभक्तीची जपणूक आणि नवी पिढीला दिलेली प्रेरणा.

## सुदर्शन विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात सायबर सुरक्षा कार्यशाळा



**लातूर/प्रतिनिधी :** राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर व क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने Cyber Shiksha for Cyber Suraksha या उपक्रमांतर्गत सुदर्शन माध्यमिक विद्यालय व सुदर्शन कनिष्ठ महाविद्यालय, लातूर येथे सायबर सुरक्षा कार्यशाळा घेण्यात आली.

'सायबर वॉरियर्स' ओमकार सूर्यवंशी व अर्जुन चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, फिशिंग मेसेज ओळखणे, पासवर्ड सुरक्षा, ऑनलाइन फसवणूक प्रतिबंध, तसेच सायबर गुन्हे नोंदणी व हेल्पलाईन १९३० याबाबत मार्गदर्शन केले.

शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. मनिषा ओवांडकर, प्राचार्य श्री. प्रविन माने, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल जबाबदारीची जाणीव वाढल्याचे शिक्षकांनी सांगितले.

## जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा अनसरवाडा येथे ७९ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**अनसरवाडा/माधव माने :** जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा अनसरवाडा येथे १५ ऑगस्ट रोजी ७९वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.




ध्वजवंदनाच्या वेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक तसेच आई संघटनेचे महाराष्ट्र राज्य कार्याध्यक्ष माधवराव माने यांची विशेष उपस्थिती होती. गावातील मान्यवर नागरिक गोविंदराव उसनाळे, माजी सभापती अजित (नाना) माने व गावचे सरपंच किशोरजी वाघमारे यांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर शाळेचे मुख्याध्यापक मा. पी. के. सोमवंशी यांच्या हस्ते ध्वजवंदन पार पडले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर भाषणे, गीत व आकर्षक कवायती सादर केल्या. या उपक्रमांमुळे वातावरण देशभक्तीच्या रंगात रंगले होते.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षकवृंद व शा.व्य.स.चे अध्यक्ष यांनी विशेष परिश्रम घेतले. शाळेच्या प्रगतीबद्दल गावातील नागरिकांनी समाधान व्यक्त करत शिक्षकांचे कौतुक केले.

## सोनार समाजाच्या दुर्लक्षित संतांच्या समाधीचे नूतनीकरण करणेची सोनार संस्थेची मागणी

**सोलापूर/प्रतिनिधी :** हरिहर नाही भेदाभेद ही संस्कृती रूढ केलेले श्री. संत नरहरी सोनार, महाद्वार, पंढरपूर याचे वडील अच्युतबाबा, आई सावित्री, मोठे बंधू पू. नारायण स्वामी यांच्या समाधी पंढरपूर पासून साधारण पणे ७ ते ८ किलोमीटर अंतरावर असलेल्या कोर्टी गावी, पंढरपूर --कराड रस्त्यावर महादेव मंदिरापासून दीड ते दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या काशी तीर्थावर आहेत. सध्या ते सर्व पडीक अवस्थेत आहेत. सदरचे ठिकाण खूप सुंदर व छान आहे.

तसेच प्रत्येक्ष भगवंत विठ्ठलासी बोलणारे संत श्री. नामदेव महाराज यांचे गुरु व सोनार समाजाचेच प्रसिद्ध संत श्री. विसोबा खेचर यांची समाधी बार्शी येथील उत्तरेश्वर मंदिराच्या शेजारी असून तीही पडीक अवस्थेतच आहे. कोर्टी ता.पंढरपूर व बार्शी येथे असलेल्या दोन्ही संतांच्या समाधीच्या ठिकाणी म्हणावी तशी स्वछता नाही. समाधीचा कार्यकाळ दर्शविणारे शिल्प जमिनीत गाडला गेला आहे.

तरी वरील नमूद समाधी स्थळांचे नूतनीकरण जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून सार्वजनिक बांधकाम विभाग अगर जिल्हा परिषद बांधकाम विभागामार्फत प्लॅन, एस्टीमेट तयार करून त्यावर छत, समाधी कट्ट्या भोंवती रेलिंग करुंन या महान संतांच्या समाधीचे पावित्र्य जपावे ही समस्त सोनार समाजाच्या वतीने आग्रहाची मागणी आहे.

तरी वरील कामाची पूर्तता करणेबाबत संबंधित विभागास आपले मार्फत आदेश द्यावेत.अशा आशयाचे निवेदन सोलापूर येथील सोनार समाज संस्थेचे अग्रणी प्रवर्तक सर्वश्री, मोहन मंद्रूपकर , संजय मैंदर्गीकर, उमेश कुरुलकर, संतोष कळमणकर अध्यक्ष वसंत पोतदार, उपाध्यक्ष विजयकुमार पोतदार, सचिव दत्तगुरु वेदपाठक,सहसचिव गिरीश जमखंडीकर, खजिनदार गजानन सोनार, सदस्य इंजि. विजयकुमार पोतदार, इंजि. रुद्रप्पा दोडमनी, प्रा. डॉ. अमर दीक्षित, सौं चित्रा पोतदार यांनी एका निवेदनाद्वारे मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस व सोलापूर जिल्हा पालकमंत्री श्री.जयकुमार गोरे यांचेकडे केली आहे.

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**विजांसह वादळ व ताशी ३०-४० किमी वाहणाऱ्या सोसाट्याच्या वाऱ्यांसह मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता...**




**अतिवृष्टी झाली की नुकसान शेतकऱ्याचे! दुष्काळ पडला की नुकसान शेतकऱ्याचे!! मात तरी कशी करावी निसर्गाच्या संकटाशी!!!**

# लातूरमध्ये मुसळधार पावसाचा फटका

## मांजरा आणि तेरणा नदीच्या पाणीपातळीत वाढ

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. संततधार पावसामुळे जिल्ह्यातील प्रमुख नद्या, म्हणजेच तेरणा आणि मांजरा दुथडी भरून वाहत आहेत. यामुळे नदीकाठच्या गावांमध्ये पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, नागरिकांना सतर्क राहण्याचा इशारा देण्यात आला आहे. विशेषतः तावरजा नदीकाठच्या शेतीत भुसनी धरणाचे दरवाजे वेळेत न उघडल्याने पाणी शिरले, ज्यामुळे पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.

या पावसामुळे जिल्ह्यातील जलसाठ्यांमध्ये मोठी वाढ झाली आहे. औसा तालुक्यातील तावरजा मध्यम प्रकल्प ७३ टक्के भरला आहे, तर माकणी येथील निम्न तेरणा धरण ८५ टक्के क्षमतेपर्यंत पोहोचले आहे. पाणलोट क्षेत्रात आणखी पावसाची शक्यता लक्षात घेता, दोन्ही प्रकल्पांतून पाण्याचा विसर्ग करण्याची तयारी प्रशासनाकडून सुरू आहे. यामुळे आगामी काळात परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता असून, प्रशासनाने नागरिकांना आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे.

लातूर जिल्ह्यासह सीमा भागांमध्ये झालेल्या मुसळधार पावसामुळे पूरस्थिती गंभीर झाली आहे. औराद शहाजानी परिसरात मांजरा आणि तेरणा नद्यांच्या संगमस्थळी पाणी पातळी प्रचंड वाढल्याने औराद शहाजानी–वांजरखेडा रस्त्यावर पाणी आले असून, वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाने नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

या विभागाने लोकांना जनावरे सुरक्षित ठिकाणी हलवण्याचे, नदी–नाले आणि पुलांपासून दूर राहण्याचं आवाहन केलं आहे. तसेच, मुलांना पाण्याजवळ जाऊ न देण्याचं आणि पूरप्रवण भागात जाणं टाळण्याचं आवाहनही करण्यात आलं आहे. दरम्यान, तावरजा नदी परिसरात झालेल्या पावसामुळे भुसणी बॅरेजचे दरवाजे वेळेवर न उघडल्याने शेतीत पाणी शिरले आणि पिकांचे मोठं नुकसान झालं. या नुकसानीला कंटाळून एका शेतकऱ्याने आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे.

**लातूरमध्ये शेतकऱ्याची आत्महत्या**

लातूर जिल्ह्यातील तावरजा नदीच्या परिसरात गुरुवारी रात्रीपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे भुसणी बॅरेजमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी जमा झाले. मात्र, बॅरेजचे दरवाजे वेळेवर न उघडल्याने हे पाणी शेतात घुसले. यामुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेली पिके पाण्याखाली गेली आणि त्यांचे मोठे नुकसान झाले.

या घटनेमुळे एका शेतकऱ्याने आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना समोर आली आहे. खंडू रामकिसन देवकते (वय ५०) या शेतकऱ्याची सुमारे दीड एकर शेती या पाण्यामुळे पूर्णपणे जलमय झाली. पिकांचे झालेले अतोनात नुकसान पाहून ते मानसिक तणावाखाली गेले आणि अखेर त्यांनी गळफास घेऊन आपले जीवन संपवले. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.



ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## ट्रम्पची वेगवेगळी भुमिका

अमेरिकेत ट्रम्प सत्तेत आल्यानंतर अमेरिकेत राजकिय वातावरणास वेगळे वळण दिसून येत आहे. मनाला वाटेल तसे वक्तव्या बरोबर निर्णयास सुरवात केली आहे. जगात आपली छाप पडावी यासाठी त्यांनी टैरिफ मध्ये भिन्नता दर्शविली आहे. भारताला पन्नासटक्के तर कोणाला पंचवीस टक्के कर टैरिफ लावला आहे. या बाबत भारताने खंबीर भुमिका घेतली आहे. मात्र अमेरिकेने जे भारताविरोधात देश आहे. सीमावर्ती देश आहेत. त्या देशांना सवलतीचे धोरण आवलंबले आहे. ट्रम्प यांचा जो मुत्सद्दीपना दर्शवित आहे त्याचा विचार करायाला पाहिजे. ट्रम्प यांनी पाकिस्तान व चीनला सवलत जाहिर केली आहे. टैरिफची अमलबजावणी करण्यात चीनला नव्वद दिवसाची सवलत दिली आहे. पंचवीसटक्के टैरिफ आकारला जाणार आहे. यामुळे भारताला कसे डवचावे या बाबत स्पष्ट संकेत मिळत आहेत. वास्तविक अमेरिकेचे आर्थिक उत्पन्न वाढवयाचे झाले तर त्यांनी समसमान कर म्हणजे टैरिफची रचना केली पाहिजे. समसमान अमलबजावणी केली असती. तसे ते करीत नाहीत. भारताचा शत्रु तो ट्रम्प यांचा मित्र समजला जात आहे. यदाकदाचित ते चुकीचे नाही. तर योग्य दिसून येते. चीनला कशासाठी सवलत जाहिर केली, तो ट्रम्प यांचा चांगला मित्र आहे म्हणून. दुसरी बाब म्हणजे पाकिस्तानचे नेते अमेरिकेत जावून धमकी देत आहेत. आम्ही अर्धेजग उडऊ शकतो. आमच्याकडे अणुबॉम्ब आहे. वास्तविक कोणाकडे अणुबॉम्ब नाही असे नाही. प्रत्येक देश हा आपआपली सुरक्षेतेसाठी, काळजी घेत आहेत. असे उघड काही सांगत नाहीत. त्याच प्रमाणे जगात भारतची ताकद काय आहे या बाबत 'ऑपरेशन सिंदुर' वरून जगाला कळली आहे. तरी ज्या-ज्यावेळी पाकिस्तानचे पंतप्रधान, संरक्षणमंत्री अमेरिकेत जातात त्या-त्यावेळी दम दिला जात आहे. हे जग पाहात आहे. त्यामुळे जगच आता पाकिस्तान हा दहशदवादी राष्ट्र म्हणून घोषीत करावे असे दिसून येते. भारत जगाला, त्याच प्रमाणे ज्या-ज्यावेळी जागतिक स्तरावर संघटनांच्या बैठका होतात त्यावेळी ओरडुन सांगत आहे की, पाकिस्तान हा दहशदवादी पोसणारा देश आहे. त्यांचे कॅम्पस पाकिस्तानात आहे. भारताने ज्यावेळी ऑपरेशन सिंदुर केले त्यावेळी पाकव्याप्त काश्मीरमधील अतिरेक्यांचे जे प्रशिक्षीत कॅम्पस् होते ते उद्धस्थ केले. अनेक दहशदवादी यात मारले केले असतील. भारताने पाक नागरिकांना धक्का लावला नाही. जे काही नुकसान केले दहशदवाद्यांचे कॅम्सचे केले आहे. मानवतेचा दृष्टीकोन ठेऊन वाटचाल केली आहे. असे असताना पाक राजकारणी अमेरिकेत जावुन गरळ ओकत असतील तर ते योग्य नाही. भारत तसा आता सक्षम देश आहे. आपली बाजू भक्कम केली जात आहे. त्यामुळे ट्रम्प यांच्या धमकीला भीख घातली गेली नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वदेशीचा नारा दिला तर संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आमची संरक्षण व्यवस्था मजबुत असल्याचे सांगितले. आम्हाला कोणाच्या मध्यस्थीची गरज नसल्याचे सांगितले. त्यामुळे भारताला पन्नासटक्के टैरिफ लावले गेले तरी भारताला मान्य नाही. यामुळे संकट येणार, काही बाबीत भारत स्वयंपुर्ण नाही याची जाण भारतीयांना आहे. अमेरिकेकडून आयात माल परवडणारा नाही. तरी पर्याय शोधावे लागतील. त्यामुळे स्वदेशीपनास अधिक महत्व दिले जाण्याची शक्यता आहे. अमेरिका भारताला आडचणीत आणण्याचा प्रयत्न करीत आहे. जे भारताचे मित्र नाहीत, अशांना अमेरिका मदत करण्याचा विडा उचललेला आहे. पाकिस्तानबाबत पुळका आल्याने भारताला रशियाकडून नाही तर पाकिस्तानकडून तेल खरेदी करावे लागेल. असे जे वक्तव्य केले ते केवळ भिडविण्याचा डाव असणार आहे. त्याच प्रमाणे ट्रम्प यांचे जे वर्तन आहे ते भारतासाठी योग्य वाटत नाही. अमेरिकेची आर्थिक उन्नती साधावयाची झाली तर समसमान टैरिफ आकारून आपले उत्पन्न वाढविले पाहिजे. ट्रम्प यांना टैरिफच्या आडून भारताला त्रास देण्याचा उघड हेतू दिसतो, म्हणून चीनला नव्वद दिवसाची सवलती व टैरिफआकार कमी दिसून येत आहे. तसेच पाकिस्तान बाबत धोरण दिसून येत आहे. त्यामुळे भारतीय नागरिकांनी ट्रम्प यांची चाल ओळखुन चालले पाहिजे. आज ट्रम्प यांची भुमिका भारताने रशियाशी मैत्री तोडावी हा प्रांजल हेतू आहे. हे भारतीयांनी ओळखले पाहिजे. त्याच प्रमाणे आज भारत रशियाकडून तेल खरेदी करीत आहे. अमेरिका कितीही ओरडत असेल किंवा दबाबतंत्र निर्माण करीत असाला तरी भारत घाबरणार नाही. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभेत जाहिर केले की, ऑपरेशनसिंदुर नंतर युद्धजन्य परिस्थितीची मध्यस्थी कोणीही केली नाही. या बाबत मी मध्यस्थी केली अशी उर बडविणारा ट्रम्प सांगणारे, भारताच्या कडक भुमिकेवरून थंड पडले. त्यानंतर ज्यांनी पन्नास टक्के टैरिफ लावला आहे. ही वाईटचाल त्यांनी खेळली आहे. यावरून भारतीयांनी जागृत राहून स्वदेशी मालावर प्रेम करावा. स्वदेशी उत्पादन वाढवावे. केवळ आयातीवर आर्थिक प्रगती होत नाही तर निर्यात मोठ्या प्रमाणात होणे अपेक्षित असते. त्यामुळे भारतीयांनी या बाबत गंभीरतेने विचार करून येणाऱ्या गणपती उत्सव, दसरा व दिपावळीमध्ये स्वदेशी वस्तू खरेदी कराव्यात. चीनी मालावर तर कटाक्षाने बहिष्कार घालावा. तरच भारत हे जीवंत राष्ट्र बनले आहे असा संदेश जगाला जाऊ शकतो. त्यामुळे उघड ट्रम्प यांचे धोरण भारतीयांना आर्थिक त्रास देण्यासारखे आहे. हे दिसून येते. चीनला कमी टैरिफ, त्याची अमलबजावणी करण्यातही सवलत, पाकिस्तानला सवलत याचा अर्थ जे भारताचे शत्रु आहेत ते आर्थिकदृष्ट्या सक्षम बनावेत. हा सरळ शुद्ध हेतू दिसून येतो. भारताविरोधात चीनचे षडयंत्र चालूच आहे. भारतीय सीमेजवळून नवा रेल्वे मार्ग काढण्याचा प्रयत्न सुरू आहे. भारताचा गिळंकृत केलेला भुभागात डोंगर पोखरून रस्ते, रेल्वेसेवा व धरणे बांधण्याचे काम चालू आहे. गलवान सारख्या भागात रस्ते सह बंकर निर्माण केले आहेत. त्यामुळे उघड व शुद्ध हेतू ट्रम्प यांचा दिसून येतो तो म्हणजे जे-जे भारताचे शत्रू आहेत ते ट्रम्प यांचे मित्र समजले जात आहेत, त्यांनाच सवलती दिल्या जातात. ही चाल ओळखण्याची गरज आहे.

# शेतकऱ्यांच्या शेतजमिनीचे सक्तीने अधिग्रहण करू दिले जाणार नाही : माजी मंत्री आमदार अमित देशमुख

**लातूर/प्रतिनिधी** : शेतकऱ्यांना भूमिहीन करण्यासाठी सरकारकडून हाती घेण्यात आलेल्या सक्तीपीठ (शक्तीपीठ) महामार्ग रद्द करण्यासाठी आपण लढा तीव्र करण्यासोबतच न्यायालयीन लढा देण्याची तयारी ठेवावी, असे आवाहन करीत हा महामार्ग रद्द होईपर्यंत लढा देत राहू आणि शेतकऱ्यांच्या शेतजमिनीचे सक्तीने अधिग्रहण अजिबात होऊ देणार नाही असा निर्धार माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी व्यक्त केला. शक्तीपीठ महामार्ग रद्द करण्यासाठी शेतकरी संघर्ष समितीकडून मुरुड अकोला या ठिकाणी आयोजित व्यापक बैठकीत ते बोलत होते.

राज्यसरकार कडून शक्तीपीठ महामार्ग बनविण्याचा घाट घातला जात असून यासाठी मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या शेतजमिनी संपादित केल्या जात आहेत. याला विरोध दर्शविण्यासाठी म्हणून माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये दि. १५ ऑगस्ट २०२५ शुक्रवार रोजी लातुर तालुक्यातील मुरुड अकोला या ठिकाणी शक्तीपीठ महामार्ग सक्ती विरोधात शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने लातुर जिल्ह्यातील तसेच या भागातील शेतकऱ्यांची व्यापक बैठक पार पडली. या बैठकीत सदरील महामार्गास शेत जामीन देण्यासाठी आपला विरोध असल्याचा ठराव शेतकऱ्यांनी मांडला.

लातूर जिल्ह्यातील, लातूर, रेनापूर, औसा तालुक्यातील असंख्य शेतकऱ्यांच्या सुपीक बागायती जमिनी या महामार्गासाठी संपादित करण्याचा शासनाचा प्रयत्न सुरू आहे. त्या भूसंपादनास शेतकरी बांधवांकडून तीव्र विरोध असल्याचे या बैठकीत दिसून आले.

यावेळी बोलताना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, नियोजित शक्तिपीठ महामार्गापासून काही किलोमीटर अंतरावर नागपूर - रत्नागिरी हा पर्यायी मार्ग उपलब्ध आहे. या शक्तिपीठ महामार्गासाठी कोणीही मागणी केलेली नसताना, केवळ कंत्राटदारांचे आणि पर्यायाने सत्ताधाऱ्यांचे भले करण्यासाठी हा महामार्ग बांधण्यात येत आहे का? असा प्रश्न आता निर्माण झाला आहे.

महाराष्ट्र राज्यावर सध्या नऊ लाख कोटी रुपयांचे कर्ज आहे, राज्यातील कंत्राटदारांची एक लाख कोटी रुपयांची देणे द्यायची आहेत. त्यात आणखी एक लाख कोटी रुपये खर्च करून, हजारो शेतकऱ्यांना भूमिहीन करून हा शक्तिपीठ महामार्ग बांधण्याचा घाट का घातला जात आहे हे समजत नाही, असे सांगून या परिस्थितीत आपण राज्यातील शेतकऱ्यांसोबत असून कोणत्या परिस्थितीत त्यांच्या जमिनीचे सक्तीने अधिग्रहण केले जाऊ दिले जाणार नाही अशी ग्वाही याप्रसंगी बोलताना दिली.

या संघर्ष सभेत पुढे बोलताना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, लातूर मध्ये आशा देखील सभेस उपस्थित राहावे लागेल अशी कधी कल्पना केली नव्हती. आदरणीय विलासराव देशमुख साहेबांच्या लातुर मध्ये शेतकऱ्यांना रस्त्यावर उतरावे लागते ही मोठी शोकांतिका आहे. कोल्हापूर ते लातुर शक्तीपीठ महामार्ग होऊ नये यासाठी राज्यातील विविध भागांतील शेतकरी या विरोधात उभा राहत आहे. या महामार्गाबद्दल चर्चा सुरू असून आपल्या ध्यानी मनी नसताना सारकारमधून फर्मान निघते आणि आपल्या पायाखालची वाळू घसरल्याची भावना आपल्या मनात जागृत होते आणि याला झोपेत धोंडा घालणे असे म्हणावे लागेल.

काश्मीरच्या पहेलगाम मध्ये अतिरेकी हल्ला झाला आणि सारे हिरावून घेतले तसेच आता आपल्या लातुर जिल्ह्यात देखील जवळजवळ दीड हजार शेतकरी आहेत तर तुमचे देखील सारे हिरावून घेतले जात आहे, मग अशांना सरकार म्हणायचे की अतिरेकी म्हणायचे असा सवाल त्यांनी यावेळी उपस्थित केला ? आपल्या गावातील, शेतातील रस्ते ठीक नाहींत असे असताना कुणी मागणी केलेली नसताना मग शक्तीपीठ मार्ग का असेही ते म्हणाले.

मराठवडयातील सर्व खासदार सोबत घेऊन राष्ट्रपती महोदयांना भेटावे व आपल्या शेतकऱ्यांच्या व्यथा मांडाव्यात अशी विनंती त्यांनी यावेळी बोलताना खा. डॉ.शिवाजी काळगे याना केली. आपला विचार आज कुणीच करायला तयार असून तुमच्या लोकप्रतिनिधीना देखील लातुर ग्रामीण म्हणजे पाकिस्तान असल्यासारखे वाटतं असे म्हणत अप्रत्यक्षरित्या लातुर ग्रामीणचे आमदार रमेश अप्पा कराड याना लक्ष केले.

आज स्वातंत्र्य दिन साजरा होत आहे आणि देशाचे पंतप्रधान महोदयांनी १३ व्या वेळी आज राष्ट्राला संबोधीत केले पण महाराष्ट्र राज्यात लातुर मध्ये काय सुरू आहे याची कल्पना त्याना नाही.या महामार्गाचे कामाकरिता जमीन घेऊन आम्हाला सरकारने बाळजबरीचा रामराम करू नये यासाठी आम्ही देखील सरकारला विनंती करू असेही ते यावेळी म्हणाले.

पुढे बोलताना आमदार अमित देशमुख म्हणाले की, नागपूर-रत्नागिरी समांतर महामार्ग असताना या नव्या महामार्गाचे गरज काय आज राज्यावर कर्ज आहे ते आणखी वाढू नये याची जबाबदारी ही आपल्यावरच आहे. सरकारने शेतीला, पिण्यासाठी पाणी द्यावे ते या पेक्षा महत्वाचे आहे,शेतीमालाला भाव नाही,शेतमाल खरेदी वेळेत करायची नाही. याउलट शेतकऱ्यांच्या जमिनी घेऊन त्यांना उध्वस्त करण्याचे काम सरकार करत आहे. शेतकरी भूमिहीन झाला तरी महामार्गाचे काम करणार असेच या सरकारने ठरवलेले दिसत आहे.तेव्हा आपण ही बाब गंभीरपणे घ्यावी व जेव्हा कधी शासनाचे अधिकारी मोजणीसाठी बंधावर येतील तेव्हा आपण तेथे थांबावे तरच शेतकरी भूमिहीन होण्यापासून वाचेल, वेळप्रसंगी आपल्याला कायदेशीर लढाई देखील लढावी लागेल, न्यायालयात कॅवेट दाखल करावे लागेल.

यापूर्वी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले होते शक्तीपीठ महामार्ग रद्द पण ऐकले नाही व विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनि त्यांचा शक्तीपीठ महामार्ग रद्दचा निर्णयच तत्कालीन रद्द केला. यामुळे आता आज आपण या सभेच्या निमित्ताने सर्वांनी एकत्रित येऊन लातुर जिल्ह्यातील एकही शेतकऱ्यांचे शेत या शक्तीपीठ महामार्गा साठी भूसंपादन होऊ देणार नाही यासाठी ठराव करावा लागेल,स्वाक्षरी मोहीम हाती घ्यावी जेणेकरून सर्वांना कळेल की,सरकार सोबत कोण आहे आणि जनते सोबत कोण आहे.आपला हा संघर्ष आत्ता सुरू झाला आहे आणि हा संघर्ष शक्तीपीठ महामार्ग रद्द होईपर्यंत सुरूच राहणार असून लातुर जिह्यात हा संघर्ष अधिक तीव्र करण्याची गरज भासल्यास तो अधिक तीव्र करण्याची भूमिका आपण स्वीकारावी लागेल असे आवाहन त्यांनी उपस्थित सर्व शेतकऱ्यांना केले.

आपले नेते राहुल गांधी यांनी जे मुद्दे मांडले आहेत ते पाहता हे षड्यंत्राने निवडून आले असून या निवडणुक प्रक्रियेत जोपर्यंत पारदर्शकता येणार येणार नाही तोपर्यंत कांही खरे नाही धीरज देशमुख कालही लढत होते आजही लढत आहेत पण ते कालही तुमच्यासाठी लढत नव्हते आणि आजही लढत नाहीत हे लक्षात घेतले पाहिजे आणि या लढ्यात आम्ही सारे आपल्या खांद्याला खांदा लावून लढणार असून काहीहि झाले तरी आपण जबरदस्तीने जमीन अधिग्रहण होऊ देणार वेळप्रसंगी लढा तीव्र करू असेही ते यावेळी म्हणाले. तसेच आजच भुसनी दौऱ्यावर असताना एका शेतकऱ्यांने आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना समजली खूप वाईट वाटले आपण शेतकरी आहोत आपण शेती करावी खचून जाऊ नये आपण एकत्रित लढा देऊ तेव्हा एकही शेतकरी आत्महत्या करणार नाही याची काळजी आपण सर्वांनी मिळून घ्यावी आम्ही आणि काँग्रेस पक्ष आपल्या सोबत आहोत वेळ प्रसंगी मुंबई ला धडक देण्याची देखील तयारी आपण ठेवावी असेही ते म्हणत शेवटीं आजच्या स्वतंत्र दिनाच्या निमित्ताने आमचे स्वतंत्र हिरावून घेऊ नका अशी सरकारला विनंती केली.

खासदार डॉ. शिवाजी काळगे म्हणाले की, महायुती सरकारने सत्तेच्या माध्यमातून मलई लाटली आहे, हजारो हेक्टर सुपीक जमीन नागपूर पासून कोल्हापूर पर्यंत शेतकऱ्यांची चालली आहे शक्तीपीठ महामार्ग जनतेवर लादला जात आहे चुकीचे निर्णय सरकार वारंवार घेत आहे गरजेच्या निर्णयाकडे ते दुर्लक्ष करतात असे त्यांनी सांगितले.

पुढे बोलताना ते म्हणाले की, या सरकारला खड्डे बुजवायला पैसे नाहीत मग हे शक्तिपीठ महामार्ग का करत आहेत. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली एकत्र येऊन आपण शक्तीपीठ महामार्ग विरोधात लढा देऊ काँग्रेस एकजुटीने शेतकऱ्यांच्या पाठीशी उभी आहे शेतकरी ही तीव्र विरोध करत आहेत शक्तिपीठ महामार्ग संघर्ष समितीच्या लढ्याला यश मिळो अशी सदिच्छा ही त्यांनी व्यक्त केली.

माजी आमदार धीरज विलासराव देशमुख यावेळी म्हणाले की, शक्तीपीठ महामार्गाला सर्व शेतकरी विरोध करत आहेत काँग्रेस पक्ष त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. महायुती सरकार कंत्राटदाराचे पैसे देत नाही, त्यामुळे राज्यातील कंत्राटदार आत्महत्या करत आहेत जनसामान्याचे महायुती ध्रुवीकरण करत आहेत, शक्तिपीठ महामार्गाचा विषय एखादा भागाचा नसून तो महाराष्ट्राचा आहे त्यामुळे जनतेने रस्त्यावर उतरावे सोशल मीडियाचा अधिक वापर सर्वांनी करावा असे त्यांनी सांगितले.

पुढे बोलताना ते म्हणाले की, शक्तीपीठ महामार्गाच्या मोजणीला लातूर जिल्ह्यात गाव बंदी करा येत्या स्थानिक स्वराज्य संस्थेत महायुती सरकार विरोधात मतदान करून शेतकऱ्यांनी सरकारची नस दाबावी आपण सर्व शेतकरी पुत्र आहोत सतर्क राहून आपण हा लढा उभारू वेळप्रसंगी न्यायालयातही आपण जाणार आहोत असे ते म्हणाले. दरम्यान या बैठकीच्या प्रारंभी माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी शेतकरी बंधू भगिनींकडून निवेदन स्वीकारली व शेतकऱ्यांचे म्हणणे देखील ऐकून घेतले.

नियोजित शक्तीपीठ महामार्ग बाधित शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने लातूर तालुक्यातील मुरुडअकोला येथे आयोजित व्यापक बैठकीत खा. डॉ. शिवाजी काळगे, माजी आमदार लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष श्री. धीरज देशमुख माजी आमदार श्री. वैजनाथदादा शिंदे, जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष श्री.अभय साळुंखे, लातूर शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष ॲड किरण जाधव, विजय जाधव,धर्मराज पाटील,अरुण दादा कुलकर्णी,सत्तार पटेल,संजय मोरे,जगदीश बावणे,ॲड.समद पटेल,सचिन पाटील, सर्जेराव मोरे,अशोक काळे,प्रमोद जाधव,प्रवीण पाटील,रामभाऊ रोंगे,विजय देशमुख, गजेंद्र येरकर,विठ्ठल देशमुख, शिवाजी बांगर,अनिल ब्याळे, बाप्पा मुंडे यांच्यासह मुरुड अकोला सह जिल्ह्यातील बाधित शेतकरी उपस्थित होते.

# यांत्रिकी विभागाच्या मदतीने तात्काळ गेट दुरुस्ती करण्याच्या केल्या सूचना




**लातूर/प्रतिनिधी** : राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री व महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शुक्रवार दि. १५ ऑगस्ट रोजी सकाळी बाभळगाव - भुसणी शिवारामधील भुसणी धरणाची पाहणी केली. या पाहणीनंतर शासनाच्या यांत्रिकी विभागाच्या मदतीने भुसनी धरणाचे गेट तात्काळ दुरुस्त करण्याच्या सूचना केल्या.

मागच्या दोन दिवसापासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे भुसनी धरणात पाण्याची अधिक आवक झाली असून नादुरूस्त गेटमुळे धरण क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या शेतात पाणी जाऊन त्यांच्या शेती पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. यासाठी सदरील धरणाचे सात पैकी चार नादुरुस्त असलेले गेट तात्काळ दुरुस्त करून घ्यावेत अशा सूचना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी यावेळी संबंधित विभागास केल्या.

यावेळी लातूर जलसंपदा विभागाच्या अधीक्षक अभियंता रूपाली ठोंबरे, कार्यकारी अभियंता अमर पाटील, उपअभियंता ओमप्रकाश थोरमोठे, लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय साळुंके, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सचिव समद पटेल, प्रवीण सूर्यवंशी, बाभळगाव ग्रा.पं. उपसरपंच गोविंद देशमुख, भुसणीचे सरपंच वीरभद्र स्वामी, ग्रामसेवक नागनाथ काळे, तलाठी प्रगती अंधोरीकर, मंडळ अधिकारी चव्हाण, एन.एस.यु.आय.चे जिल्हाध्यक्ष रामराजे काळे, शेतकरी काशिनाथ मुक्तापुरे, पतंगे, राजकुमार मुक्तापुरे आदिसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, शेतकरी उपस्थित होते.

**आमदार अमित देशमुख यांनी आत्महत्याग्रस्थ शेतकऱ्याच्या कुटुंबीयांचे केले सांत्वन**

माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी औसा तालुक्यातील भुसनी येथील शेतकरी खंडू देवकते यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. खंडू देवकते यांनी स्वतःच्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली होती. या दुर्दैवी घटनेनंतर आमदार देशमुख यांनी कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांना धीर दिल दिला.

## शेतकरी हवालदिल:सोयाबीन, मूग पिकांवर अळीचा प्रादुर्भाव ३० टक्क्यांपर्यंत उत्पादन घटण्याची भीती

**वलांडी/प्रतिनिधी** :वलांडी तालुक्यात गेल्या आठवड्यात झालेल्या समाधानकारक पावसामुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाची लहर उमटली होती. कोरड्या पडलेल्या पिकांना पाणी मिळाल्याने सोयाबीन, मूग, उडीद, तूर, ज्वारी यासह इतर पिकांनी जोम धरला. हिरवाईने माळरान नटले आणि भरघोस हंगामाची आशा पल्लवित झाली. मात्र, या आनंदावर आता अळ्यांच्या प्रादुर्भावाचे गडद सावट पडू लागले आहे. विशेषतः सोयाबीन व मूग पिकांवर पाने कुरतडणाऱ्या व शेंगा पोखरणाऱ्या अळ्यांचे प्रमाण वाढले आहे. काही ठिकाणी उडीद व तूर पिकांनाही याचा फटका बसू लागला आहे. गेल्या ८ते १० दिवसांपासून अळ्यांचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढत आहे. अळींच्या हल्ल्यामुळे पानगळ, फुलकळी गळणे, शेंगा अपूर्ण राहणे, तसेच पिकांची वाढ खुंटणे ही लक्षणे दिसत आहेत. त्यामुळे उत्पादनात २५ ते ३० टक्क्यांपर्यंत घट येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. काही शेतकऱ्यांनी कीटनाशकांची फवारणी केली असली तरी अपेक्षित परिणाम मिळत नसल्याचे सांगितले. शिवाय औषधांचे दर चढे असल्याने एकरी ३५०० ते ४००० रुपये पर्यंतचा खर्च वाढत आहे. परिणामी शेतकऱ्यांच्या खिशाला कात्री बसत आहे. कृषी विभागाने शेतकऱ्यांना अळीचा प्रादुर्भाव दिसताच त्वरीत फवारणी करण्याचे, योग्य कीडनाशके वापरण्याचे, फेरफटका वाढवण्याचे पिक पद्धतीचा अवलंब करण्याचे आवाहन केले आहे. मेहनत वाया जाण्याची भीती पावसामुळे पिकांना जीव आला होता, पण आता अळ्यांच्या हल्ल्यामुळे सगळी मेहनत वाया जाण्याची भीती आहे. औषधं महाग झाली आहेत, आणि फवारणी करूनही फारसा फरक दिसत नाही. एकरी ३५०० ते ४००० रुपयांपर्यंत खर्च वाढतो आहे. आधीच खतं, बियाणं यावर खर्च झाला आहे.

# माजी मंत्री, आ. अमित देशमुख यांनी बाभळगाव निवासस्थानी नागरिकांच्या घेतल्या भेटीगाठी, निवेदनांचा केला स्वीकार

**लातूर/प्रतिनिधी** : राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री व महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शुक्रवार दि. १५ ऑगस्ट रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहरासह जिल्हाभरातून आलेल्या विविध संस्था संघटना, काँग्रेस महाविकास आघाडी मित्र पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिकांची भेट घेऊन त्यांच्या अडीअडचणी, समस्या समजून घेत त्यांची निवेदने, तसेच निमंत्रणाचा स्वीकार करून संबंधितांना तात्काळ पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सूचना केल्या. तसेच सर्वांना ७९ व्या स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या.



यावेळी लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय साळुंके, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सचिव समद पटेल, महाराष्ट्र नाभिक महामंडळ लातूरचे जिल्हाध्यक्ष भाऊसाहेब शेंद्रे, श्याम देशमुख, प्रवीण सूर्यवंशी, बाभळगावचे उपसरपंच गोविंद देशमुख, अशोक चौधरी, आतिश चिकटे, गोपाळ थडकर, अविनाश देशमुख, बालाजी मुळे, नितीन मुळे, सुवर्णा मुळे, वैजनाथ देशमुख, सचिन मस्के, उमेश मस्के, महादेव ढमाले, मनोज वाघमारे, सिद्धेश्वर वाघमारे, लखन वाघमारे, दयानंद सुरवसे,ज्ञानेश्वर वाघमारे, संदीप वाघमारे, प्रशांत वाघमारे, हनमंत वाघमारे, अनिल वाघमारे, श्रीपाल वाघमारे, औदुंबर बनसोडे आदिसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आज बाभळगाव निवासस्थानी लातूर शहरातील प्रभाग क्र. १० मधील कल्पना नगर येथील काँग्रेस कार्यकर्ते श्रीकांत गर्जे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या. यावेळी लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती सुनील पडिले, अजय यादव, अजय वागदरे, आकाश भगत आदि उपस्थित होते.

# पुन्हा हिंदी-चिनी भाई भाई?

ज्या चीनशी भारताचा वाद होता, तो चीन आता ट्रम्प यांच्यामुळे मोदी आणि भारताच्या बाजूने बोलू लागला आहे. अमेरिकेच्या करविरोधात राजकीय मुत्सद्देगिरी स्वीकारत मोदी चीन आणि जपानच्या दौऱ्यावर जात आहेत. भारत-चीन संबंधांना नवी दिशा देण्याच्या आणि सीमावाद सोडवण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. गलवान संघर्षानंतर तणावपूर्ण राहिलेले भारत-चीन संबंध सुधारण्याच्या दिशेने ही भेट एक मोठे पाऊल मानले जाते.

भारतावर प्रचंड आयात शुल्क लावल्यानंतर चीनने अमेरिकेवर टीका करत भारताची बाजू उचलून धरली. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी शांघाय सहकार्य परिषदेच्या निमित्ताने चीन दौऱ्याचे सूतोवाच करताच चीनने पायघड्या घालण्याचेच बाकी ठेवले. एकंदरीत, अमेरिकेचे महत्त्व कमी करण्यासाठी चीन भारताला आपल्याजवळ घेऊ पाहत आहे. मात्र, चीनने भारताची पाठराखण का करतोय हे तपासत आपण सावध असायला हवे.

अलीकडेच चीनने अमेरिकेच्या आयातशुल्काबाबत भारताने घेतलेल्या कठोर भूमिकेचे कौतुक केले. चीनचे सरकारी वृत्तपत्र असलेल्या 'ग्लोबल टाईम्स'ने संपादकीयामध्ये भारत आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे कौतुक केले. 'मोदी चीन दौऱ्यावर येत आहेत, ही खूप मोठी गोष्ट आहे. याचा फायदा चीन आणि भारताला होईल. यामुळे संपूर्ण प्रदेशात शांतता आणि स्थिरता वाढेल. पुन्हा एकदा चीन आणि भारत भाऊ होतील', असे म्हणत 'ग्लोबल टाईम्स'ने लिहिले की, कठीण काळात भावाला मदत करणे स्वतःसाठीदेखील फायदेशीर आहे. 'ग्लोबल टाईम्स'च्या संपादकीयाला ट्रम्प यांच्या भारतावरील टॅरिफचा संदर्भ होता. भारतातील चीनचे राजदूत झू फेहोंग यांनी ट्रम्प यांच्या 'टॅरिफ'ला विरोध केला होता आणि ट्रम्प यांची भूमिका जागतिक व्यापार कराराच्या नियमांविरुद्ध असल्याचे म्हटले होते. चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने मोदी यांच्या चीन भेटीच्या निर्णयाचे स्वागत केले आणि म्हटले की, ही भेट दोन्ही देशांना जवळ आणेल. रशिया, चीन आणि भारत यांच्यातील वाढत्या जवळीकीमुळे ट्रम्प चिंतेत आहेत. त्यांनी भारताबद्दल आपली भूमिका कठोर केली आहे. या महिन्यात अमेरिकेचे एक पथक व्यापार करारावर चर्चा करण्यासाठी भारत दौऱ्या

डोनाल्ड ट्रम्प भारताला रशियाकडून तेल खरेदी न करण्याची धमकी देत राहिले. चीनला सवलती देत राहिले; पण मोदी यांनी संकटाचे संधीत रूपांतर केले. भारत, चीन आणि रशिया यांनी एक आघाडी केली, तर तिघे मिळून ट्रम्प यांच्या 'टॅरिफ साम्राज्या'ला संपवू शकतात. सर्वात मोठी गोष्ट म्हणजे ज्या चीनशी भारताचा वाद होता, तो आता ट्रम्प यांच्यामुळे मोदी आणि भारताच्या बाजूने बोलू लागला आहे. अमेरिकेच्या करविरोधात राजकीय मुत्सद्देगिरी स्वीकारत मोदी चीन आणि जपानच्या दौऱ्यावर जात आहेत. ते चीनमध्ये शी जिनपिंग यांच्याशी द्विपक्षीय बैठक घेऊ शकतात. पंतप्रधान मोदी ३१ ऑगस्ट आणि एक सप्टेंबर रोजी चीनमध्ये असतील. २०२० मध्ये गलवान खोऱ्यात भारत-चीनी सैनिकांमध्ये झालेल्या संघर्षानंतर मोदी पहिल्यांदाच चीनला भेट देणार आहेत. पंतप्रधान म्हणून ते सहाव्यांदा चीन दौऱ्यावर जात आहेत. २०१४ मध्ये पंतप्रधान झाल्यानंतर त्यांनी २०१५, २०१६, २०१७, २०१८ मध्ये चीनला भेट दिली आहे. याशिवाय, भारत आणि चीन या दोन्ही देशांच्या राष्ट्रप्रमुखांची शेवटची बैठक ऑक्टोबर २०२४ मध्ये रशियातील काझान येथे झालेल्या 'ब्रिक्स' शिखर परिषदेदरम्यान झाली होती. मोदी यांच्या चीन दौऱ्याचा आणि 'एसस

पुन्हा महिंदी-चिनी भाई भाईफ? एकंदरीत, भारत-चीन संबंधांना नवी दिशा देण्याच्या आणि सीमावाद सोडवण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. गलवान संघर्षानंतर तणावपूर्ण राहिलेले भारत-चीन संबंध सुधारण्याच्या दिशेने ही भेट एक मोठे पाऊल मानले जाते. २०२० मध्ये गलवान खोऱ्यात भारत-चीन सैनिकांच्या चकमकीनंतर दोन्ही देशांमधील शत्रूत्व अगदीच शिगेला पोहोचले. शांघाय सहकार्य संघटनेच्या (एससीओ) पंचविसाव्या बैठकीत सहभागी होऊन मोदी प्रादेशिक सुरक्षा, दहशतवाद आणि व्यापार यासारख्या मुद्द्यांवर करार करू शकतात. द्विपक्षीय बैठकीत भारत-चीन सीमा तणाव कमी करण्यावर आणि परस्पर सहकार्य वाढवण्यावर चर्चा होऊ शकते. व्यापार युद्ध आणि जकातीच्या वादाच्या पार्श्वभूमीवर, ही भेट भारताची राजनैतिक स्थिती मजबूत करण्यासाठी जागतिक व्यासपीठावर आवाज उठवण्याची सुवर्णसंधी प्रदान करेल. भारत पाश्चात्य देशांसोबत सहकार्य वाढवत असल्याने चीनचा दौरा रशियासोबतच्या संबंधांमध्ये संतुलन साधण्याची संधीदेखील आहे.


लडाखमधील प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरील तणाव कमी करण्याचे प्रयत्न अधिक मजबूत होऊ शकतात. भारत आणि चीन व्यापार तूट आणि आर्थिक सहकार्याच्या मुद्द्यावर चर्चा करू शकतात. मोदी यांच्या चीन दौऱ्यामुळ भारत-अमेरिकेतील संबंध गेल्या काही दशकांमधील सर्वात खालच्या पातळीवर पोहोचले. अमेरिकेसोबतच्या तणावाच्या पार्श्वभूमीवर मोदी चीनला भेट देणार आहेत. जून २०२० मध्ये गलवानमध्ये भारतीय आणि चीनी सैनिकांमध्ये झालेल्या चकमकीनंतरभारत आणि चीनदरम्यानचे संबंध कमालीचे दुरावले. या चकमकीनंतर दोन्ही देशांनी एकमेकांना अटकाव घालण्यासाठी अनेक कठोर पावले उचलली. पंतप्रधान मोदींच्या या दौऱ्यामुळे चीन आणि भारत यांच्यातील संबंधांवरचा बर्फ वितळत असल्याचे दिसून येत आहे.

'स्पुतनिक इंडिया' संस्थेच्या अहवालात म्हटले आहे की भारत आता चीनशी जवळीक साधत आहे आणि ते अमेरिकेमुळे होत आहे. मोदी चीनमध्ये होणाऱ्या 'एससीओ' शिखर परिषदेला उपस्थित राहणार आहेत. तथापि, त्यांच्या निर्णयाकडे चीनकडे झुकणे किंवा अमेरिकेविरुद्ध सुडाची कारवाई म्हणून पाहिले जाऊ नये. ते केवळ भारताची धोरणात्मक स्वायत्तता दर्शवते. ट्रम्प यांच्या टॅरिफ निर्णयामुळे भारताचा अमेरिकेसोबतचा तणाव वाढला आहे; परंतु भारत 'एससीओ'मधील सहभागाचा वापर सौदेबाजीचे साधन म्हणून करत नाही. चीन आणि भारत यांच्यात स्पर्धा आहे. चीनकडे झुकण्याऐवजी किंवा अमेरिकेपासून दूर राहण्याऐवजी भारत जटिल भू - राजकीय परिस्असे असले तरी भारत-चीन सहकार्याच्या बाबतीत सावधगिरी बाळगली पाहिजे. दोन्ही देश अजूनही एकमेकांना प्रतिस्पर्धी मानतात आणि संयुक्त आघाडी तयार करण्याऐवजी प्रतिस्पर्ध्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी शिखर परिषदेचा वापर करत आहेत. गलवान खोऱ्यातील चीनी सैनिकांच्या घुसखोरीनंतर दोन्ही देशांमधील संबंध सर्वात खालच्या पातळीवर आले. तथापि, आता त्यात सुधारणा होताना दिसत आहे. भारत आणि चीनमध्ये शत्रुत्व असूनही अलीकडच्या काळात संबंधांवरील बर्फ वितळताना दिसत आहे. ट्रम्प यांनी भारतावर कर लादण्याच्या घोषणेनंतर चीनने तीव्र नाराजी व्यक्त करत नवी समीकरणे बनवण्याच्या उद्देशाने काही विधाने केली. चीनच्या मते, अमेरिका इतर देशांना दडपण्यासाठी कर लादत आहे. आता दोन्ही देश रशियासह ट्रम्प यांना प्रत्युत्तर देऊ शकतात अशी चर्चा आहे. 'एससीओ' शिखर परिषदेत पंतप्रधान मोदी यांची उपस्थिती युरेशियामध्ये बहुपक्षीय राजनैतिकतेसाठी भारताची वचनबद्धता दर्शवते. या भेटीमुळे भारताला प्रादेशिक सुरक्षा, दहशतवाद आणि व्यापार सहकार्य यासारख्या मुद्द्यांवर आपले मत व्यक्त करण्याची संधी मिळेल. मोदी यांचा चीन दौरा अमेरिकेला स्पष्ट संदेश देईल की, भारत त्याच्या परराष्ट्र धोरणात वाढू शकतो.-

आरिफ शेख

# अटल बिहारी वाजपेयी: एक महान राजकारणी आणि कवी

लोकनेते असा नावलौकिक असलेले श्री.अटल बिहारी वाजपेयी हे राजकीय वचनबद्ध्तेसाठी ओळखले जातात. १३ ऑक्टोबर १९९९ रोजी त्यांनी सलग दुसऱ्यांदा राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारचे प्रमुख म्हणून पंतप्रधान पदाची सूत्रे स्विकारली. १९९६ साली थोड्या कालावधीसाठी त्यांनी पंतप्रधान म्हणून काम पाहिले होते. पंडित नेहरुनंतर सलग दुसऱ्यांदा जनादेश मिळवून पंतप्रधान होणारे ते पहिले पंतप्रधान ठरले.



ज्येष्ठ संसदपटू असलेले अटल बिहारी वाजपेयी राजकारणात चार दशक सक्रीय होते. श्री. वाजपेयी नऊ वेळा लोकसभेवर तर दोनवेळा राज्यसभेवर निवडून आले होते हाही एक प्रकारचा विक्रमच आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात भारताचे अंतर्गत व परकीय धोरणास आकार देण्यात एक पंतप्रधान, परराष्ट्र मंत्री, विविध स्थायी समित्यांचे अध्यक्ष व एक विरोधी पक्ष नेते म्हणून त्यांनी समर्थपणे भूमिका बजावली. ब्रिटीश सत्तेला भारतातून पायउतार करण्यात महत्वाच्या ठरलेल्या १९४२ मधील भारत छोडो चळवळीमध्ये सहभागी होऊन विद्यार्थीदशेतच वाजपेयी यांनी राष्ट्रवादी राजकारणाचे धडे गिरवले. राज्यशास्त्र व कायद्याचे विद्यार्थी असलेल्या श्री. वाजपेयींना शालेय काळातच परकीय व्यवहारामध्ये रुची निर्माण झाली होती. त्यांनी ही आवड पुढे अनेक वर्ष जोपासली व विविध द्विपक्षीय व बहुपक्षीय व्यासपीठांवर भारताचे प्रतिनिधित्व करताना त्यांनी ह्या कौशल्याचा उपयोग केला.

श्री. वाजपेयी यांनी एक पत्रकार म्हणून आपल्या कारकीर्दीची सुरुवात केली परंतु अल्पावधीतच म्हणजेच १९५१ साली भारतीय जनसंघात प्रवेश करण्यासाठी त्यांनी पत्रकारिता सोडली. राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील महत्वाचा घटक असलेला भारतीय जनता पक्ष हा आधी जनसंघ म्हणून ओळखला जात होता. समीक्षकांकडून प्रशंसा मिळवलेले श्री. वाजपेयी एक ख्यातनाम कवी आहेत. शिवाय आपल्या व्यस्त कामातून वेळ काढून ते संगीत व पाक कलेतही विशेष रस घेतात.

२५ डिसेंबर १९२४ साली तत्कालीन ग्वालियर संस्थानातील (आताच्या मध्यप्रदेश राज्यात आहे) एका प्राथमिक शिक्षकाच्या घरात श्री. वाजपेयी यांचा जन्म झाला.

अटल बिहारी वाजपेयी यांचा सामाजिक जीवनातील उदय हा भारतीय लोकशाही व त्यांच्या कुशाग्र राजकीय बुद्धिमत्तेचा गौरव आहे. उदारमतवादी जागतिक दृष्टीकोन व लोकशाही तत्वांशी असलेली बांधिलकी यामुळे जनसामान्यांना त्यांच्याबद्दल आदर वाटतो.

महिला सबलीकरण व सामाजिक समानतेचे खंबीर समर्थक असलेले श्री. अटल बिहारी वाजपेयी भारताला आंतरराष्ट्रीय पातळीवर सर्व देशांमध्ये एक दूरदर्शी, विकसित आणि मजबूत राष्ट्र म्हणून बघू इच्छितात. ५००० वर्षांची ऐतिहासिक संस्कृती लाभलेल्या व आगामी १००० वर्षांमध्ये येणारी आव्हाने पेलण्यास तयार असलेल्या भारत देशाचे ते प्रतिनिधित्व करतात.

भारताप्रती असलेले त्यांचे निस्वार्थ समर्पण व पन्नास वर्षाहून अधिक काळ देशासाठी दिलेल्या निस्पृह सेवेबद्दल त्यांना भारतातील दुसरा सर्वोच्च नागरी सन्मान असलेला पद्मविभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. १९९४ साली उत्कृष्ट संसदपटूचा पुरस्कारही त्यांना मिळाला आहे. एका उल्लेखानुसार, अटल बिहारी वाजपेयी नावाप्रमाणेच एक ज्येष्ठ भारतीय नेते, निष्णात राजकारणी, निस्पृह सामाजिक कार्यकर्ते, बलवान वक्ते, कवी, साहित्यिक, पत्रकार व खऱ्या अर्थाने बहुआयामी व्यक्तिमत्त्व होते. जनसामान्यांच्या आशा आकांक्षा श्री. वाजपेयी यांनी पूर्ण केल्या. त्यांच्या कार्यातून आजही त्यांची राष्ट्राप्रती असलेली निष्ठा प्रतीत होते.

अटल बिहारी वाजपेयी (२५ डिसेंबर १९२४ - १६ ऑगस्ट २०१८) हे एक भारतीय राजकारणी आणि कवी होते. त्यांचा जन्म ग्वाल्हेर, मध्य प्रदेश येथे झाला होता. ते भारतीय जनता पक्षाचे (इगझ) नेते होते आणि भारताचे १० वे पंतप्रधान म्हणून त्यांनी तीन वेळा काम केले.

राजकीय कारकीर्द:

वाजपेयींनी आपल्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात भारतीय जनसंघाचे सदस्य म्हणून केली. १९६० आणि १९७० च्या दशकात ते भारतीय राजकारणातील एक प्रमुख व्यक्तिमत्व बनले. १९७७ मध्ये ते मोरारजी देसाई यांच्या सरकारमध्ये परराष्ट्र व्यवहार मंत्री झाले.

१९८० मध्ये भारतीय जनता पक्षाची स्थापना झाल्यावर वाजपेयी त्याचे एक प्रमुख नेते बनले. त्यांनी १९९० च्या दशकात पक्षाला राष्ट्रीय स्तरावर मजबूत करण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले.


१९९६, १९९८-१९९९, आणि १९९९-२००४ अशा तीन वेळा ते भारताचे पंतप्रधान झाले. त्यांच्या पंतप्रधानपदाच्या काळात, त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण आर्थिक आणि सामाजिक सुधारणा केल्या.

कवी म्हणून:अटल बिहारी वाजपेयी एक उत्कृष्ट कवी देखील होते. त्यांनी अनेक कविता आणि लेख लिहिले आहेत. त्यांची लेखनशैली लोकांना खूप आवडते. त्यांच्या कवितांमध्ये देशभक्ती, प्रेम, आणि सामाजिक विषयांवरील भावना व्यक्त होतात. थळज्ञळशिवळर ने नमूद केले आहे की त्यांच्या प्रसिद्ध कवितांमध्ये गीत नया गाता हूँ, क्यो डरे आणि मेरी इक्यावन कविताएँ यांचा समावेश आहे.

व्यक्ती म्हणून:अटल बिहारी वाजपेयी एक सभ्य, मृदू भाषिक आणि दिलदार राजकारणी म्हणून ओळखले जातात. त्यांनी नेहमीच देशाच्या प्रगतीसाठी काम केले. त्यांच्या निधनामुळे देशाने एक महान नेता आणि कवी गमावला

## डॉक्टर टिप्स

**तुम्ही डेमिसेक्शुअल (demisexual) तर नाही, जाणून घ्या याचे लक्षण**



मागील काही वर्षांमध्ये सेक्शुएलिटीबद्दल लोक जास्त खुलून बोलू लागले आहे. आता या मुद्द्यांवर प्रत्येक व्यक्ती आपले विचार आणि आवड निवड व्यक्त करू लागला आहे. अलैंगिक, हा एक असा शब्द आहे ज्याबद्दल आतापर्यंत तुम्ही फारच कमी किंवा कदाचित ऐकले ही नसेल. यात ते लोक येतात ज्यांना सेक्सची इच्छा नसते किंवा जे रिलेशनशिपबगैर संबंध बनवण्यास तयार होऊन जातात आणि ते लोक मुलगी असो की मुलगा दोघांशी संबंध बनवण्यास तयार होऊन जातात.

**डेमिसेक्शुअल कशे असतात ?**

आपल्या पार्टनरसोबत वैवाहिक जीवनाच्या आनंद घेण्यासाठी डेमिसेक्शुअल लोकांना एक खोल भावनात्मक प्रतिबद्धतेची गरज असते. हे बगैर प्रेमाचे कोणाशीही संबंध ठेवत नाही. यांच्यासाठी भावनात्मक नात सेक्सपेक्षा जास्त महत्त्वाचे असते.

## विनोद




साहिल : 'दहा मिनिटं झाली तरी फोनवर तु फक्त हो, हो म्हणताय?'

अजय : 'अरे, बाबा, माझ्या बायकोचा फोन होता.'

## संदेश

Santa ne challenge kiya.....
"Ki woh kutubminar ko sr pe rakh k mumbai le jayega"...
Sare new channel wale waha pahuch gye....
Tab bola "Bas koi utha k sar pe rakh de"...

## सुविचार



आत्मविश्वास असावा पण अंहकार नसावा.

-अज्ञान


**संस्कृत सुभाषित**

**शरदि न वर्षति गर्जति ।**
**वर्षति वर्षासु नि:स्वतो मेघ:।**
**नीचो वदति न कुरुते ।**
**न वदति सुजनः करोत्येव॥**

**अर्थ :** शरद ऋतुत मेघ नुसताच गर्जतो, वर्षा ऋतुत न गर्जणारा मेघ बरसतो, दुष्ट नुसताच बडबडतो, काही करत नाही, सज्जन बोलत नाहीत तर करूनच दाखवतात.

# मनोरंजक महाशब्दकोडे

कोडे क्र.९



### आडवे शब्द

१. पूर्वी गाणीबातम्या ऐकण्यासाठी याचा वापर करीत
४. पराक्रमी
७. रामदासांचे प्रसिद्ध काव्य
११. खलाशी
१२. कर्णभूषण
१४. गोष्ट
१५. केविलवाणा
१६. पुसट, धूसर
१७. असत्य
१९. सुगरण पक्ष्याचे घरटे
२२. भांडण
२३. मर्यादा, अंत
२५. वाडवडिलांनी कमावलेले
२६. तल्लीन
२७. मैत्रीण
२८. पार्वती
२९. किल्ला
३०. उलट, प्रतिकूल
३४. धनको
३६. मालिका, हार
३७. हनुमान
३८. समशेर
४०. काकुनी
४२. अफवा
४३. हुलगे
४५. सहाय्य
४६. विविध प्रकारचे
४७. लहान
५०. पाण्याचा नळ
५१. वायू
५३. सभा
५४. कोरडे, वैराण
५५. लेखणी
५७. आवड
५९. पाषाण
६१. दारूचा एक प्रकार
६२. वि.वा. शिरवाडकरांचे हे नाटक विशेष लोकप्रिय आहे
६४. चिंतन
६६. लक्ष्मी
६७. विषयांध
७२. धूळ, केर
७४. श्रावणात अनेकजण याची पूजा करतात
७७. सत्यवानाची बायको
७९. गुलामी
८०. कमी दर्जाचे
८१. नेमस्त

### उभे शब्द

१. वाळू
२. शिजवलेला भात
३. भूमी
५. हसण्याजोगे, पोरकट
६. रुदन
८. स्त्री
९. धार्मिक काव्याचा एक प्रकार
१०. कथालेखक
१२अ. पाकिट
१५. दिवाळी
१८. झाडापासून मिळणारे आरोग्यवर्धक शीतपेय
२०. गोफण, बेचकी
२१. कमावलेले (धन)
२२. घट्ट
२३. आंब्याची एक जात
२४. पंढरीची पायी यात्रा
२६. रामायणातील प्रसिद्ध अरण्य
२७. बेचव
२८. एक लोकप्रिय वाङ्मायप्रकार
२९. तृण
३१. कामकुचार, सुस्त
३२. अंगठ्यापासून सर्वात दूरचे बोट
३३. गगन
३५. जाडसर दळलेला गहू
३६. पीछेहाट
३९. मार्गस्थ
४०. ही साखर गुलकंदात वापरतात
४१. नवरा
४३. कपटी
४४. पक्ष्यांचा समूह
४६. आवाज
४८. मऊ
४९. पूर्वज
५०. अपुरा
५२. कोल्ह्यासारखा पशू
५३. नमस्कार
५६. यथेच्छ
५८. सार्वभौम राजा
६०. चांगले
६३. एकाग्र दृष्टी, ६५. भ्रतार
६७. छळ, त्रास
६८. खरेपणा
६९. रानात पसरलेली आग
७०. मत्स्य
७१. कागदकापड कापण्याचे साधन
७२. केव्हा
७३. बेकरी मालासाठी आवश्यक पदार्थ
७५. रोटीचा एक प्रकार
७६. प्राण नेणारा देव
७८. तांबूल

### आडवे उत्तरे

१.रेडियो ४.बहादूर ७.मनाचे श्लोक ११.दर्यावर्दी १२.डूल १४.कथा १५.दीन १६.अस्पष्ट १७.खोटे १९.खोपा २२.तंटा २३.परावार २५.वडिलोपार्जित २६.दंग २७.सय २८.काली २९.गड ३०.विपरीत ३४.सावकार ३६.माळ ३७.बजरंगबली ३८.तरवार ४०.खर्डेघाशी ४२.वावडी ४३.कुळीथ ४५.मदत ४६.नाना ४७.सान ५०.तोटी ५१.वात ५३.सद ५४.रखरखीत ५५.कलम ५७.रस ५९.शिला ६१.रम ६२.नटसम्राट ६४.मनन ६६.श्री ६७.कामुक ७२.कचरा ७४.सत्यनारायण ७७.सावित्री ७९.दास्य ८०.हीन ८१.मवाळ

### उभे उत्तरे

१.रेती २.ओदन ३.अवनी ५.हास्यास्पद ६.रडू ८.नारी ९.श्लोक १०.कथाकार १२अ.लखोटा १५.दीपावली १८.नीरा २०.गलोल २१.अर्जित २२.तंग २३.पायरी २४.वारी २६.दंडकारण्य २७.सपक २८.कादंबरी २९.गवत ३१.आळशी ३२.करंगळी ३३.अंबर ३५.रवा ३६.माघार ३९.रवाना ४०.खडीसाखर ४१.दादला ४३.कुटील ४४.थवा ४६.नाद ४८.नरम ४९.पितर ५०.तोकडा ५२.तरस ५३.सलाम ५६.मनमुराद ५८.सम्राट ६०.छान ६३.टक ६५.नवरा ६७.काच ६८.प्रत्यही ६९.वणवा ७०.मासा ७१.कात्री ७२.कधी ७३.मैदा ५.नान ७६.यम ७८.विडा




# ३५ मिनिटे एकत्र घालवल्यानंतर झाकीर खान बीटीएस बँडमधील सदस्यांना ओळखू शकला नाही..

मुंबई-बीटीएस हा एक म्युझिक बँड आहे, ज्याचे सात सदस्य भारतासह अनेक देशांमध्ये लोकप्रिय आहेत. या बँडच्या गाण्यांचा क्रेझ हा जगभरात आहे. या बँडला जगभरातील लोक ओळखतात. मात्र भारतातील लोकप्रिय कॉमेडियन झाकीर खान हा या बँडमधील सदस्यांना ओळखू शकला नाही. तो त्यांच्याबरोबर सुमारे ३०-३५ मिनिटे एकाच खोलीत उपस्थित होता, तरी त्याला या बँडबद्दल आणि सात सदस्यांच्या लोकप्रियताबद्दल काहीही जाणीव झाली नाही. झाकीरनं एका मुलाखतीत सांगितलं की, ''मी एकदा कोरियाला गेलो होतो आणि तिथे बीटीएस नावाचा एक खूप लोकप्रिय म्युझिक बँडही उपस्थित होता. मला माहित होतं की, बीटीएस नावाचा एक बँड आहे आणि मला हे देखील माहित होते की ते खूप प्रसिद्ध आहेत. यानंतर योगायोगानं मी तिथे एका कार्यक्रमासाठी गेलो होतो, जिथे मला एका खूप मोठ्या सेलिब्रिटीची मुलाखत घ्यायची होती आणि तो बँड देखील त्याच सेलिब्रिटीला भेटण्यासाठी तिथे आला होता.''



झाकीरने बीटीएस बँडबद्दल काय गैरसमज झाला : झाकीर पुढं सांगितलं की, तो ज्या सेलिब्रिटीची मुलाखत घेणार होता, त्याच्या कार्यक्रमाला तो उशिरा पोहोचला. ज्यामुळे त्याला बीटीएसच्या सदस्यांबरोबर राहावे लागले होते. या काळात त्याला हे अजिबात समजलं नाही की, तो ज्या लोकांबरोबर राहत होता ते बीटीएस बँड ग्रुपचे सदस्य होते. झाकीर त्याच्या संवादात असेही सांगितले की, त्याने बीटीएसच्या सदस्यांना चुकीचे समजले होते. यानंतर त्याने पुढे म्हटले, ''मी तिथे उशिरा पोहोचलो असल्याने, मला बीटीएस सदस्यांसह शेवटच्या बॅचमध्ये ठेवण्यात आले होते. यानंतर मी तिथल्या बँडच्या एका सदस्याला विचारलं की तू कोण आहेस आणि तू कुठून आला आहेस?'' त्याने मला सांगितले की तो बीटीएसचा आहे. ''त्यावेळी मला वाटले की, कोरियन ऑर्गनायझिंग टीमने पडद्यामागे बीटीएसला ठेवले आहे. मला कल्पना नव्हती की, ते इतके प्रसिद्ध लोक आहेत. नंतर जेव्हा मी लोकांना सांगितले की मी बीटीएस सदस्यांबरोबर ३५ मिनिटे एकाच खोलीत होतो, तेव्हा ते बेशुद्ध पडले.''

बीटीएस ग्रुप : दरम्यान बीटीएस बँडबद्दल सांगायचे झाले तर, या ग्रुपमध्ये ७ सदस्य आहे. यामध्ये जिन, सुगा, जे-होप, आरएम, जिमिन, व्ही, जंग कूक असे सुंदर गायक आणि डान्सर आहेत, जे सध्या संपूर्ण जगाचे मनोरंजन करत आहेत. या सदस्याच्या डान्स आणि गायन शैलीने चाहत्यांना वेड लावले आहेत. त्यांचे चाहते स्वत:ला बीटीएस आर्मी म्हणतात. आता हा ग्रुप कधी एकत्र येईल, यांची अनेकजण वाट पाहात आहेत, सध्या सर्व सदस्य त्यांच्या वैयक्तिक संगीत प्रवासाकडे पुढे गेले आहेत.

# गुप्त चित्रपट पाहिल्यानंतर संतापले होते अमिताभ बच्चन



मुंबई-बॉलिवूड अभिनेत्री काजोलचा आज ५१ वा वाढदिवस आहे. काजोलने आपल्या आतापर्यंतच्या कारकिर्दीत अनेक वेगवेगळ्या भूमिका साकारल्या आहेत. ९० च्या दशकातील आघाडीच्या अभिनेत्रींमध्ये तिचाही समावेश होता. 'दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे', 'करण अर्जुन', 'प्यार किया तो डरना क्या', 'कभी खुशी कभी गम' असे अनेक सुपरहिट चित्रपट तिच्या नावावर आहे. काजोलने खास करुन रोमँटिक भूमिका साकारल्या. पण एका चित्रपटात तिने आपल्या रोमँटिक हिरोईनच्या इमेजला छेद देत व्हिलन साकारला होता. ही भूमिका अनेकांना आश्चर्याचा धक्का देणारी होती. हा चित्रपट गुप्त होता, ज्याने बॉक्स ऑफिसवर अक्षरश: धुमाकूळ घातला होता.

१९९७ मध्ये रिलीज झालेला गुप्त क्राइम थ्रिलर असून, या चित्रपटाच्या शेवटी नेमका व्हिलन कोण आहे हे उघड येतं. जेव्हा काजोल व्हिलन असल्याचं समोर येतं तेव्हा अनेकांना तो आश्चर्याचा धक्का होता. त्या काळात तर याची तुफान चर्चा झाली होती. कारण कोणीही काजोलला या भूमिकेत अपेक्षित केलं नव्हतं. नेमकी हीच प्रतिक्रिया अमिताभ बच्चन यांचीही होती. या चित्रपटात काजोलसह बॉबी देओल आणि मनिषा कोईराला प्रमुख भूमिकेत होते. जेव्हा हा चित्रपट तयार झाला होता तेव्हा अनेकजण राजीव राय यांच्या बाजूने नव्हते. एखाद्या हिरोईनला व्हिलन दाखवणं अनेकांना पटणारं नव्हतं. अमिताभ बच्चन तर माझ्यावर ओरडले होते असा खुलासा राजीव राव यांनी एका मुलाखतीत केला आहे.

राजीव राय यांनी एका मुलाखतीत सांगितलं होतं की, ''अमिताभ बच्चन यांनी चेन्नईलमधील ट्रायल शोला गुप्त चित्रपट पाहिला आणि दुसऱ्या दिवशी मला फोन केला. त्यांनी मला तुम्हाला आत्मविश्वास वाटतोय का? तुम्ही काजोलला व्हिलन दाखवले आहे. तुम्हाला विश्वास आहे का? तुम्ही इतका विश्वास कसा काय ठेवू शकता? असे विचारले होते''.

राजीव यांनी पुढे सांगितले की, एकाप्रकारे सीनिअर असल्याने ते मला ओरडले होते. माझ्यावर ते ओरडले होते. त्यांनी पुढे म्हटले होते की, एकाप्रकारे अमिताभ गुप्त यांनी काजोलला व्हिलन दाखवण्याच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. राजीव यांनी सांगितले की, ''हे चालेल यावर तुमचा विश्वास कसा काय आहे?''

त्यावर राजीव राय यांनी उत्तर दिले होते की, ''माझ्याकडे तुमच्या प्रश्नाचं उत्तर नाही. आत बुधवार आहे, कृपया दोन दिवस वाटा पाहा. तुम्हाला याचं उत्तर मिळेल''. अखेरीस चित्रपट जेव्हा प्रदर्शित झाला तेव्हा तो सुपरहिट ठरला. अमिताभ बच्चन आणि राजीव यांचे वडील निर्माते गुलशन राय यांच्यासह 'दीवार' आणि 'त्रिशूल' सारख्या चित्रपटांमध्ये काम केले आहे.

# मराठी सिनेमा जगलाच पाहिजे! महायुती सरकार ॲक्शन मोडमध्ये



मुंबई-मराठी चित्रपटसृष्टीला भेडसावणाऱ्या अनेक प्रश्नांवर आता शिंदे सरकार ॲक्शन मोडमध्ये आलं आहे. उपमुख्यमंत्र्यांच्या पुढाकाराने मंत्रालयात झालेल्या एका महत्त्वाच्या बैठकीत मराठी चित्रपटांना मल्टीप्लेक्समध्ये पुरेसे शो मिळवून देण्यासोबतच, यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी एक समिती स्थापन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. 'मराठी सिनेमा जगलाच पाहिजे,' अशी ठाम भूमिका या बैठकीत घेण्यात आली. गेल्या अनेक दिवसांपासून मराठी चित्रपट निमर्ति आणि वितरक मल्टीप्लेक्स मालकांकडून होणाऱ्या मनमानी कारभाराला कंटाळले होते. त्यांना मिळणाऱ्या कमी स्क्रीन, कोणतीही पूर्वसूचना न देता चित्रपट थिएटरमधून काढून टाकणं, आठवड्याचे शुल्क घेऊन उर्वरित रक्कम परत न देणं, सेन्सॉर संमती मिळण्यात होणारा विलंब, आणि ऐनवेळी खेळांच्या वेळा बदलणं अशा अनेक समस्यांमुळे मराठी सिनेसृष्टीला मोठा फटका बसत होता.

याच प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुढाकाराने आज मंत्रालयात एक बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, मनसे चित्रपट सेनेचे अमेय खोपकर, शिवसेना चित्रपट सेनेचे सुशांत शेलार यांसारख्या अनेक महत्त्वाच्या व्यक्ती उपस्थित होत्या.या बैठकीत उपमुख्यमंत्री शिंदे यांनी निर्माते, वितरक आणि मल्टीप्लेक्स मालकांचं म्हणणं ऐकून घेतलं. ते म्हणाले, ''मराठी चित्रपट निर्माते जगले, तरच मराठी सिनेमाला चांगले दिवस येतील.'' त्यांनी या प्रश्नावर कायमस्वरूपी उपाय काढण्यासाठी एक उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला.गृह विभागाचे अपर मुख्य सचिव या समितीचे अध्यक्ष असणार आहेत. या समितीत अनेक महत्त्वाचे अधिकारी, मराठी चित्रपट निर्माते, वितरक, मल्टीप्लेक्स मालक, फिल्म सिटीचे प्रतिनिधी आणि चित्रपट महामंडळाचे

# 'सैयारा'मुळे वाद; अजित पवार म्हणाले, ''उत्तम चित्रपट असेल तर...


मुंबई-मोहित सुरी यांचा सैयारा हा चित्रपट सध्या बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत आहे. या चित्रपटाची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत आहे. पण आता या चित्रपटामुळे महाराष्ट्रात वादाला तोंड फुटलं आहे. सैयारा चित्रपटामुळे येरे येरे पैसा ३ या मराठी चित्रपटाला प्राइम टाइममध्ये स्लॉट मिळत नाही, असा आरोप होत आहे. याबाबत पत्रकारांनी उपमुख्यमंत्री अजित पवारांना मराठी चित्रपटांना स्क्रीन मिळत नाहीत याबद्दल प्रश्न विचारला.

उत्तम चित्रपट आला की लोकष्ठ

यावर उत्तर देताना अजित पवार म्हणाले, ''मी तुम्हाला सांगतो, जर चित्रपट उत्तम असेल, तर सगळे चित्रपट लावतात. मला मागचा काळ आठवतो. दादा कोंडकेंचे सात की आठ चित्रपट सिल्व्हर जुबिली ठरले. आज लोकांना सांगावे लागत नाही. उत्तम चित्रपट आला की लोक त्या चित्रपटाला प्रतिसाद देतात.''

काही गोष्टींना उत्तरही द्यायचे नाही

पत्रकारांशी संवाद साधताना पुढे अजित पवार म्हणाले, ''काही लोकांचे वेगळे विचार असतात.






कोण कसे असते, कोण कसे असते, हे विचारून तुम्ही मझाही वेळ घेऊ नका आणि पुन्हा त्यांना 'अजित पवार असे म्हणाले' हे विचारून त्यांचाही वेळ घेऊ नका. आम्हाला हे धंदे करायचे नाहीत. आम्हाला विकास करायचा आहे. तुम्ही सर्वजण हुशार लोक आहात. तुम्ही विकासाला जेवढं महत्त्व द्यायला पाहिजे, तेवढं महत्त्व देत नाही.'' ते पुढे म्हणाले, ''तुम्ही विचारायला येता की, 'हा असं बोलला, तुमचं काय मत आहे?' माला कोणतंही मत व्यक्त करायचं नाही. संविधानाने प्रत्येकाला मते मांडायचा अधिकार दिला आहे आणि काही गोष्टींना आम्हाला उत्तरही द्यायचं नाही.''

सैयारा विरुद्ध येरे येरे पैसा ३

चित्रपटगृहांचे मालक 'सैयारा' या हिंदी चित्रपटाला प्राधान्य देत आहेत. 'येरे येरे पैसा ३' या मराठी चित्रपटाला आठवड्यात एकदाही प्राईम टाइम स्लॉट मिळाला नाही. आता हा चित्रपट सिनेमागृहांमधून काढून टाकला जात असल्याचा आरोप होत आहे. संजय जाधव दिग्दर्शित 'येरे येरे पैसा ३' चित्रपटाची निर्मिती मनसे नेते अमय खोपकर यांनी केली आहे. निर्माते आणि मनसे नेते अमय खोपकर म्हणाले की, ''हा माझा चित्रपट आहे पण मी माझ्या चित्रपट आहे म्हणून मराठी चित्रपटांना स्रीन न मिळण्याच्या प्रकाराला विरोध करणार नाही. पण जर हे इतर कोणत्याही मराठी चित्रपटासोबत झाले तर मल्टीप्लेक्सच्या काचा फुटतील!''

# दोन अभिनेत्रींच्या किसिंग सीनमुळे वाद



मुंबई-अलीकडच्या काळात बॉलीवूड सिनेमांमध्ये इंटिमेट किंवा किसिंग सीन असणं सामान्य गोष्ट आहे. पण पूर्वी असं नव्हतं. चित्रपटातील इंटिमेट सीनवरून वाद व्हायचे. ८० च्या दशकातील एका चित्रपटात दोन अभिनेत्रींमध्ये जवळीक दाखवण्यात आली होती. त्यातील दृश्ये पाहून मोठा वाद निर्माण झाला होता. तब्बल १० कोटी रुपये खर्च करून निर्मिती करण्यात आलेला हा सिनेमा फ्लॉप ठरला होता. त्या काळी या चित्रपटामुळे बॉलीवूडलासुद्धा आर्थिक फटका बसला होता. कमाल अमरोही यांनी बनवलेला रझिया सुलतान हा चित्रपट १९८३ मध्ये रिलीज झाला होता. या चित्रपटाचं बजेट तब्बल १० कोटी रुपये होतं. हा तेव्हाचा सर्वात महागडा चित्रपट होता. यामध्ये हेमा मालिनी, धर्मेंद्र, परवीन बाबी, सोहराब मोदी आणि अजित असे दमदार कलाकार होते. मात्र चित्रपट बॉक्स ऑफिसवर सपशेल आदळला होता. प्रेक्षकांना चित्रपटात वापरलेली उर्दू भाषा समजली नाही, तर काहींनी हा सिनेमा खूप मोठा असल्याची टीका केली. धर्मेंद्र यांनी ॲबिसिनियन गुलाम योद्धा याकूतची भूमिका करण्यासाठी ब्लॅकफेसचा वापर केल्याची टीकाही झाली होती. १० कोटींचे बजेट असलेल्या मरझिया सुलतानफ्ने फक्त दोन कोटींची कमाई केली होती.किसिंग सीनमुळे वादात अडकला चित्रपटमरझिया सुलतानफ्मध्ये सुरुवातीला राणीचा एकटेपणा, नंतर याकूतबरोबरचा रोमान्स या गोष्टी दाखवण्यात आल्या होत्या. यामध्ये खाकून नावाच्या मदतनीसची भूमिका परवीन बाबीने साकारली होती. या खाकून व रझिया यांच्यातील जवळीक, रोमान्स सिनेमात दाखवला होता. अमरोही यांनी दोघींमध्ये रोमान्स दाखवण्यासाठी एक प्रेम गीत वापरलं होतं. यात दोघींमध्ये गालावर किस करण्याचा एक सीन होता. त्याकाळी पडद्यावर समलिंगी किस दाखवणं मोठी गोष्ट होती. या सीनमुळे चित्रपटाबद्दल नकारात्मकता पसरली. त्यामुळे प्रेक्षकांनी त्याकडे पाठ फिरवली होती.

अमरोही यांनी कर्ज काढून बनवलेला सिनेमा मरझिया सुलतानफ चित्रपट तयार व्हायला बरीच वर्षे लागली होती. या चित्रपटासाठी शेकडो लोकांनी काम केलं होतं. अमरोही यांनी सिनेमा बनवायला इंडस्ट्रीतील खूप लोकांकडून कर्ज घेतलं होतं. त्यांनी क्रू मेंबर्सना चित्रपट रिलीज झाल्यावर पैसे देण्याचं वचन दिलं होतं. मात्र सिनेमा फ्लॉप ठरला, त्याचा परिणाम बॉलीवूडमधील इतर अनेक चित्रपटांवर झाला होता. आर्थिक संकट झालं होतं. चित्रपट फ्लॉप झाल्यावर अमरोही यांनी बहुतांश क्रू मेंबर्सना स्वत:च्या खिशातून पैसे दिले होता. मात्र काही वितरक आणि प्रदर्शकांना या सिनेमामुळे आर्थिक फटका बसला होता.

मरझिया सुलतानफ अमरोहींचा शेवटचा चित्रपट

या चित्रपटामुळे आर्थिक फटका बसूनही बॉलीवूड सावरले, मात्र ते कमाल अमरोहीने जमले नाही. हा सिनेमा फ्लॉप झाल्यावर त्यांनी मुघल शासक बहादूरशाह जफर यांच्यावर एक स्क्रिप्ट लिहायला सुरुवात केली, मात्र ती स्क्रिप्ट ते कधीच पूर्ण करू शकले नाही. १९९३ मध्ये कमाल अमरोही यांचे निधन झाले आणि मरझिया सुलतानफ हा त्यांचा शेवटचा चित्रपट ठरला.

# ज्येष्ठ बंगाली अभिनेत्री बसंती चॅटर्जी यांचे निधन



कोलकाता : प्रख्यात बंगाली अभिनेत्री बसंती चॅटजी यांचे मंगळवारी रात्री निधन झाले. त्यात ८८ वर्षांच्या होत्या. गेली पाच दशके त्यांनी प्रेक्षकांच्या मनावर राज्य केले. एकूण १०० चित्रपटांत त्यांनी काम केले होते. त्यामध्ये ठगिणी, मंजारी ऑपेरा आणि अलो यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. दूरचित्रवाणी मालिकातही त्या झळकल्या होत्या. त्यामध्ये भुतू, बोरोन, दुर्गा दुगेशारी यांचा समावेश होता. गीता एलएलबी या मालिकेत त्यांनी शेवटचे काम केले. त्यानंतर त्या आजारी पडल्या होत्या. उमेदीच्या काळात त्यांनी अनेक नाटकांत काम केले होते. प्रदीर्घ काळापासून त्या कर्करोगाशी झुंज देत होत्या. महिनाभर त्यांच्यावर रुग्णालयातील अतिदक्षता विभागात उपचार सुरू होते. यानंतर डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्यांना घरी निरीक्षणाखाली ठेवले होते. त्यासाठी परिचारिकेची व्यवस्था केली होती, अशी माहिती पश्चिम बंगाल मोशन पिक्चर आर्टीस्ट फोरमने दिली.

# रश्मिका आणि विजय यंदाच्या इंडिया डे संचलनाच ग्रँड मार्शल

न्यूयॉर्कमध्ये रंगणार कार्यक्रम



मुंबई : जागतिक स्तरावर भारताच्या स्वातंत्र्यदिनाचे सर्वात मोठे आणि आकर्षक संचलन, ४३वे इंडिया डे संचलन, रविवार, १७ ऑगस्ट रोजी न्यूयॉर्कमधील 'मॅडिसन ॲव्हेन्यू' येथे रंगणार आहे. या महोत्सवासाठी अभिनेत्री रश्मिका मंदन्ना आणि अभिनेता विजय देवरकोंडा यांना यंदाचे 'ग्रँड मार्शल' म्हणून विशेष मान दिला आहे.


न्यूयॉर्क येथील भारताच्या कन्सुलेट जनरल कार्यालयात पार पडलेल्या २७ जून रोजीच्या उद्घाटन समारंभात फेडरेशन ऑफ इंडियन असोसिएशन्सने (एफआयए) याची घोषणा केली होती. फेडरेशन ऑफ इंडियन असोसिएशन्सतर्फे आयोजित या संचलना संदर्भात नुकतीच भारतीय वाणिज्य दूतावासाकडून न्यूयॉर्क येथे घोषणा करण्यात आली. या कार्यक्रमात दोन्ही कलाकारांनी सहा भाषांमध्ये - हिंदी, तेलुगू, तमिळ, कन्नड, मल्याळम आणि इंग्रजीत एकत्रित व्हिडिओ संदेश देत आमंत्रणाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत, १७ ऑगस्ट रोजी होणार्या संचलनामध्ये सहभागी होण्याची उत्सुकता दर्शवली होती.


# महावतार नरसिम्हाची रुपेरी पडद्यावर धमाल, चित्रपटाला मिळाली उत्कृष्ट रेटिंग...

मुंबई-क्लेम प्रॉडक्शन्स आणि होम्बाले फिल्म्सचा 'महावतार नरसिम्हा' चित्रपट थिएटरमध्ये प्रदर्शित झाला आहे. हा चित्रपट सध्या खूप पसंत केला जात आहे. या चित्रपटातील दृश्य खूप धमाकेदार आहे. मनोरंजक कथानकासह, हा चित्रपट भारतीय संस्कृती आणि परंपरेचे सौंदर्य सर्वोत्तम प्रकारे दाखवणारा एक जबरदस्त यश म्हणून उदयास आला आहे. 'महावतार नरसिम्हा' पाहण्यासाठी लोक मोठ्या संख्येनं थिएटरमध्ये येत आहेत. अनेकजण या चित्रपटाचे कौतुक देखील करत आहेत. हा चित्रपट फक्त मनोरंजन करणारा नाही, तर एक सांस्कृतिक आयकॉन बनला आहे. या चित्रपटाला प्रेक्षकांकडून भरपूर प्रेम मिळत आहे. आता चित्रपटाला उत्कृष्ट रेटिंग देखील मिळाली आहे.'महावतार नरसिम्हा'

चित्रपट आला प्रेक्षकांना पसंत : 'महावतार नरसिम्हा' हा एका शानदार सिनेमॅटिक अनुभवापेक्षा कमी नाही. चित्रपटाला मिळत असलेल्या प्रचंड कौतुकादरम्यान, त्याचे रेटिंग देखील रेकॉर्ड तोडत आहेत - बुक माय शो वर ९.८१०, गुगल वर ५५ आणि आयएमडीबी वर ९.८१०. हे रेटिंग कोणत्याही भारतीय चित्रपटासाठी आतापर्यंतचे सर्वोच्च मानले जाते, जे प्रेक्षकांकडून त्याला मिळत असलेल्या अफाट प्रेम आणि आदराचे स्पष्टपणे दर्शन घडवते. होम्बाले फिल्म्स आणि क्लेम प्रॉडक्शन्सनं संयुक्तपणे या भव्य ॲनिमेटेड फ्रँचायझीची अधिकृत लाइनअप जारी केली आहे, जी पुढील दशकासाठी भगवान विष्णूच्या दहा दैवी अवतारांची कथा सांगेल. ही फ्रँचायझी महावतार नरसिम्हा (२०२५)नं सुरू झाली आहे, त्यानंतर महावतार परशुराम (२०२७), महावतार रघुनंदन (२०२९), महावतार द्वारकाधीश (२०३१), महावतार गोकुलानंद (२०३३), महावतार कल्की भाग १ (२०३५) आणि महावतार कल्की भाग २ (२०३७) येईल.

'महावतार नरसिम्हा' चित्रपटाबद्दल : ही ॲनिमेटेड फ्रँचायझी भारतीय पौराणिक कथा भव्यतेनं प्रेक्षकांसमोर सादर करेल. 'महावतार नरसिम्हा' हा चित्रपट अश्विन कुमार यांनी दिग्दर्शित केला आहे आणि शिल्पा धवन, कुशल देसाई आणि चैतन्य देसाई यांनी क्लेम प्रॉडक्शन अंतर्गत याची निर्मिती केली आहे. आकर्षक कंटेंटसाठी ओळखल्या जाणाऱ्या होम्बाले फिल्म्सच्या सहकार्यानं, या भागीदारीचा उद्देश विविध मनोरंजन प्लॅटफॉर्मवर एक सिनेमॅटिक उत्कृष्ट नमुना सादर करणे आहे. आश्चर्यकारक दृश्ये, सांस्कृतिक विविधता, उत्कृष्ट चित्रपट निर्मिती तंत्रे आणि मजबूत कथाकथन असलेला हा चित्रपट ३ आणि पाच भारतीय भाषांमध्ये प्रदर्शित झाला आहे.





### लातूर येथे ७९ व्या स्वातंत्र्य दिनी पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते ध्वजारोहण

# शासकीय योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीतून लातूर जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साधणार - पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

**लातूर/प्रतिनिधी** :जिल्ह्यात केंद्र व राज्य शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर भर देण्यात येत आहे. यामाध्यमातून जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साधून नागरिकांना गुणवत्तापूर्ण आणि कालबद्ध सेवा देण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत, असे राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सांगितले.

भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात आयोजित मुख्य शासकीय समारंभात पालकमंत्री श्री. भोसले बोलते होते. प्रारंभी पालकमंत्र्यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्यात आले. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूलकुमार मीना, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त श्रीमती मानसी यांच्यासह स्वातंत्र्य सैनिक, माजी सैनिक, वीरपत्नी, वीरमाता, वीरपिता, अधिकारी-कर्मचारी, पत्रकार बांधव, विद्यार्थी, पालक व नागरिक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्ह्यातील पायाभूत सुविधा बळकटीकरणाला गती देण्यात आली आहे. लातूर शहराच्या २९० कोटींच्या वाढीव पाणीपुरवठा योजनेला मंजुरी देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतीच केली आहे. तसेच जिल्ह्यात जलसंधारण आणि शेती क्षेत्राच्या विकासासाठी विशेष प्रयत्न सुरू आहेत. मनरेगा अंतर्गत फळबाग लागवड योजना, जलयुक्त शिवार अभियान आणि गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार यासारख्या योजनांमुळे शेतीला बळ मिळत असल्याचे पालकमंत्र्यांनी यावेळी नमूद केले. जिल्ह्यातील शेतरस्ते अतिक्रमणमुक्त करण्यासाठी राबविण्यात आलेल्या मोहिमेत आतापर्यंत ८८२ किलोमीटर लांबीचे ६७८ रस्ते अतिक्रमणमुक्त झाले आहेत. लवकरच या रस्त्यांच्या दुतर्फा वृक्ष लागवड करण्यात येणार असल्याचे ते म्हणाले.







ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्राच्या माध्यमातून प्रयत्न केले जात आहेत. या प्रयत्नांची दखल राष्ट्रीय स्तरावर घेण्यात आली असून जिल्ह्यातील २७ आरोग्य संस्थांना राष्ट्रीय गुणवत्ता हमी मानांकन मिळाले आहे. यासोबतच गरजू रुग्णांना मुख्यमंत्री सहायता निधीतून सहाय्य मिळवून देण्यासाठी जिल्हास्तरावर कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे. या कक्षामार्फत अवघ्या तीन महिन्यात १४३ रुग्णांना अर्थसहाय्य मिळवून देण्यात आल्याचे पालकमंत्री श्री. भोसले म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या शंभर दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिमेत जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयाने उत्स्फूर्त सहभाग घेतला. आता या मोहिमेचा दीडशे दिवसांचा दुसरा टप्पा सुरु आहे. यामध्ये विकसित महाराष्ट्र, ई-गव्हर्नन्स सुधारणा, आणि सेवा विषयक प्रशासकीय सुधारणा यांवर भर दिला जात आहे. याचाच एक भाग म्हणून लातूर जिल्हा परिषदेने व्हाटसअप चॅटबोट उपक्रम सुरु केला आहे. यामाध्यमातून नागरिकांना जिल्हा परिषदेमार्फत राबविल्या जाणाऱ्या योजना, ऑनलाईन अर्ज प्रक्रियेबाबत माहिती व्हाटसअपवर मिळेल. नागरिकांना गुणवत्तापूर्ण सेवा प्रदान केल्यामुळे उदगीर उपविभागीय कार्यालय, लातूर जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयाला आयएसओ मानांकन मिळाले असल्याचे पालकमंत्री म्हणाले.

**जवळपास ८० हजार शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा वीज**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने राज्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० राबविण्यात येत आहे. या योजनेतून जिल्ह्यात ४७ सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाले असून यामधून २३० मेगावॉट वीज निर्मिती होत आहे. त्यामुळे जवळपास ८८ हजार शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा वीज मिळत असल्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सांगितले.

**मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान, आदिशक्ती अभियानात सहभागी होण्याचे आवाहन**

महिलांच्या सशक्तीकरणासाठी राज्य शासनाने आदिशक्ती अभियान सुरु केले आहे. याअंतर्गत महिलांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्य विषयक समस्यांबाबत कायमस्वरूपी उपाययोजना करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. तसेच यंदा प्रथमच मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राबविले जाणार आहे. गावा-गावांमध्ये विकासाची निकोप स्पर्धा निर्माण होण्यासाठी हे अभियान उपयुक्त ठरणार आहे. जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींनी या अभियानात सहभागी होण्याचे आवाहन पालकमंत्र्यांनी यावेळी केले.

**पर्यावरण संवर्धन मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन**

राज्यातील सर्वात कमी वृक्ष असलेल्या जिल्ह्यांमध्ये लातूर जिल्ह्याचा समावेश होतो. हे चित्र बदलण्यासाठी आपलं लातूर हरीत लातूर मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेत सहभागी होवून प्रत्येकाने किमान एकतरी झाड लावावे, असे आवाहन पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केले.

ध्वजारोहणानंतर पोलीस उपनिरीक्षक रामदास मिसाळ यांच्या पथकाने राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. या कार्यक्रमाला उपस्थित स्वातंत्र्य सैनिक, शहीद जवानांच्या वीरपत्नी, वीरमाता, वीरपिता यांचा पालकमंत्री श्री. भोसले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच विविध योजना, उपक्रमांच्या अंमलबजावणीमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणारे अधिकारी, कर्मचारी यांच्यासह उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायती, विद्यार्थी यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उद्धव फड यांनी केले.

## लातूर एमआयटी येथे उत्साहात स्वातंत्र्य दिनानिमित्त आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते ध्वजारोहण





**लातूर/प्रतिनिधी** : भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने माईर्स एमआयटी वैद्यकीय शैक्षणीक संकुल, लातूर येथे शुक्रवार १५ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ९.१५ वाजता लातूर एमआयटीचे कार्यकारी संचालक तथा लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांच्या प्रतिमेस आ. रमेशअप्पा कराड यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर मोठ्या उत्साहाच्या आणि राष्ट्रभक्तीच्या वातावरणात ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी लातूर एमआयटीचे परिसर समन्वयक पृथ्वीराज कराड, वैद्यकीय महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. पी. जमादार, उपअधिष्ठाता डॉ. बी. एस. नागोबा, प्रशासकीय व शैक्षणिक संचालिका डॉ. सरिता मंत्री, शैक्षणिक संचालक डॉ. चंद्रकांत शिरोळे यांच्यासह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी एमआयटी परिसर समन्वयक पृथ्वीराज कराड यांच्या हस्ते धन्वंतरी वैद्यकीय महाविद्यालय कर्मचारी पतसंस्थेच्या वतीने सभासद कर्मचाऱ्यांच्या नव्वद टक्केहून अधिक गुण प्राप्त करणाऱ्या गुणवंत पाल्यांचा विविध पारितोषिके देऊन सत्कार करण्यात आले. त्याचबरोबर रुग्णालय कक्षात उत्कृष्ट काम केल्याबद्दल परिचारिका श्रीमती आशा सोनवळे, मीरा बजगुडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच उत्कृष्ट कर्मचारी अध्यापक डॉ भागवत शेळके, ग्रंथपाल चाफेकर यांचाही यथोचित सत्कार करून गौरव करण्यात आला.

याप्रसंगी नर्सींग महाविद्यालयाचे प्राचार्य सरवननसेना, दंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. यतीश जोशी, उपप्राचार्य डॉ अमोल डोईफोडे, रूगणालय अधीक्षक डॉ. एकनाथ माले, डॉ. अरुणकुमार राव, डॉ. विद्या कांदे, डॉ. चंद्रकला पाटील, डॉ. पठाण, डॉ. बी. एस. वारद, डॉ. मुकुंद भिसे, डॉ. कस्तुरे, डॉ चंद्रकांत चाटे, डॉ. पठाण, डॉ तोष्णीवाल, डॉ. शैला बांगड, डॉ. आशा पिचारे, डॉ. क्रांती केंद्रे, डॉ. क्रांती पाटील, डॉ. कुलकर्णी मुख्य प्रशासकीय अधिकारी सचिन मुंडे, प्रशासकीय अधिकारी मधुकर गुट्टे, श्रीपती मुंडे यांच्यासह एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालय व यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालय, एमआयडीएसआर दंत महाविद्यालय, फार्मसी महाविद्यालय, फिजीओथेरपी महाविद्यालय व नर्सिंग महाविद्यालयातील विभाग प्रमुख, प्राध्यापक, डॉक्टर, विद्यार्थी, पालक व नागरीक ध्वजारोहण कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संजय गांधी निराधार योजना तालुकास्तरीय समिती रेणापूर अध्यक्षपदी आंबेकर तर लातूरचे अध्यक्ष भिसे







**लातूर/प्रतिनिधी** : भाजपा नेते तथा लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या शिफारशीनुसार रेणापूर आणि लातूर तालुका संजय गांधी निराधार योजना समिती जाहीर करण्यात आली असून रेणापूर तालुका अध्यक्षपदी सतीश आंबेकर यांची तर लातूर तालुका बन्सी भिसे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या नेतृत्वात राज्यात महायुतीचे सरकार सत्तेवर आल्यापासून अनेक जनहिताचे निर्णय घेतले जात आहेत. भाजपाचे नेते तथा लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या शिफारशीनुसार राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री मा. शिवेंद्रसिंह राजे भोसले साहेब यांनी रेणापूर आणि लातूर तालुका संजय गांधी निराधार अनुदान योजना समिती जाहीर केली आहे. त्यानुसार मा. जिल्हाधिकारी लातूर यांनी सदरील नियुक्तीचे पत्र नुकतेच संबंधितांना पाठविले आहे.

नव्याने गठीत करण्यात आलेल्या संजय गांधी निराधार योजना समितीत रेणापूर तालुका समिती अध्यक्ष सतीश आंबेकर नरवटवाडी, सदस्य ललिता अरुण कांबळे पानगाव, अनुसया कोंडीराम फड कुंभारी, विठ्ठल काशिनाथ कस्पटे निवाडा, विजय लक्ष्मण चव्हाण रेणापूर, गोविंदराव नानासाहेब देशमुख डिगोळ देशमुख, सदानंद केदारनाथ पिंपळे खरोळा, कुलदीप राजकुमार सूर्यवंशी आरजखेडा, दीपक संदिपान पवार वाला, सुरेश रामराव बुड्डे आनंदवाडी यांची तर लातूर तालुका समिती अध्यक्ष बन्सी भगवानराव भिसे सारसा, सदस्य रुपेश सूर्यकांत काळे भातखेडा, श्रीमती अनिता पांडुरंग बालवाड भातांगळी, श्रीमती श्रुती अविनाश सवई मुरुड, रमेश उद्धव लहाडे रूई, बाबासाहेब साहेबराव भिसे गाधवड, अरविंद फुलचंद पारवे शिराळा, राजकुमार काशिनाथ सुरवसे चिंचोली (ब), विनायक मल्हारी मगर रामेगाव, योगीराज रामराव साखरे भिसेवाघोली यांचा समावेश करण्यात आला आहे.

रेणापूर आणि लातूर या दोन्ही समिती नियुक्त करून निराधारांना आधार देण्याचे काम केल्याबद्दल जिल्ह्याचे पालकमंत्री मा. शिवेंद्रसिंग राजे भोसले भाजप नेते आ. रमेशआप्पा कराड यांचे आभार व्यक्त करून नवनिर्वाचित अध्यक्षासह समिती सदस्यांचे अनेकांनी अभिनंदन केले आहे.

## तावरजा, तेरणा नदी काठावरील गावांना सतर्कतेचा इशारा

**लातूर/प्रतिनिधी** : औसा तालुक्यातील तावरजा मध्यम प्रकल्पाचा पाणीसाठा ७३ टक्के झाला आहे. प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात पुढील दोन-तीन दिवसात पावसाची शक्यता असल्याने हा प्रकल्प निर्धारित धरण पातळीस पोहचण्याची शक्यता आहे. त्यानंतर प्रकल्पात येणारा येवा तावरजा नदीमार्गे सोडावा लागणार आहे. तसेच धाराशिव जिल्ह्यातील लोहारा तालुक्यातील माकणी येथील निम्न तेरणा धरणाचा पाणीसाठा ८५ टक्के झाला असून धरण निर्धारित धरण पातळी ओलांडण्याची शक्यता आहे. त्यानंतर धरणात येणारा येवा तेरणा नदीपात्रात सोडावा लागणार आहे. त्यामुळे तावरजा व तेरणा नदीकाठच्या गावांना, शेतकऱ्यांना, नदीकाठी वस्ती करुन राहिलेल्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

नागरिकांनी दुभती तसेच इतर जनावरे झाडाखाली, पाण्याच्या स्त्रोताजवळ, विद्युत खांबाजवळ बांधू नयेत. त्यांना सुरक्षित ठिकाणी बांधावे. आपल्या जनावरांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करुन स्वत: सुरक्षित ठिकाणचा आसरा घ्यावा. जलसाठ्याजवळ, नदीजवळ जावू नये. आपल्या मुलांना जलसाठ्यावर, नदीवर पोहण्यासाठी पाठवू नये. शाळा, महाविद्यालयातील शिक्षकांनी आपल्या विद्यार्थ्यांना याबाबत सूचित करावे. पुलावरुन, नाल्यावरुन पाणी वाहत असतांना कोणीही स्वत: किंवा वाहनासह पूल, नाला ओलांडण्याचा प्रयत्न करु नये. पूर प्रवण क्षेत्रात कोणीही जावू नये. पाऊस सुरु असतांना विजेच्या तारा, जुन्या इमारती कोसळण्याची शक्यता असते, तरी त्यापासून दूर राहण्याची खबरदारी घ्यावी, असे आवाहन लातूर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणमार्फत करण्यात आले आहे.

### लातूर जिल्ह्यात चोवीस तासांत सरासरी ४४.६ मिलीमीटर पावसाची नोंद

**लातूर/प्रतिनिधी** : जिल्ह्यात १५ ऑगस्ट रोजी सकाळी आठ वाजता संपलेल्या चोवीस तासांत सरासरी ४४.६ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. यामध्ये शिरूर अनंतपाळ तालुक्यात सर्वाधिक ९५.२ मिलीमीटर, तर जळकोट तालुक्यात सर्वात कमी १८.८ मिलीमीटर पाऊस झाला आहे. तालुकानिहाय पावसाची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे- लातूर- ६८.१, औसा- ५४.२, अहमदपूर- २२.४, निलंगा- ५४.२, उदगीर- २६.६, चाकूर- २९.५, रेणापूर- २०.७, देवणी- ६२.८, शिरूर अनंतपाळ- ९५.२ आणि जळकोट- १२.५ मिलीमीटर.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.


शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# ‘केशवराज’ मध्ये स्वातंत्र्य दिनानिमित्त शिष्यवृत्ती परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा उत्साहात संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात दि. १५ ऑगस्ट २०२५ शुक्रवार रोजी ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त शिष्यवृत्ती परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा उत्साहात संपन्न करण्यात आला. प्रथम केशवराज शैक्षणिक संकुल, स्थानिक समन्वय समितीचे कार्यवाह शैलेश कुलकर्णी यांच्या हस्ते सकाळी विद्यालयात ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहणानंतर महावृक्षलागवड अभियानांतर्गत मान्यवरांच्या हस्ते शालेय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यानंतर शिष्यवृत्ती परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी मंचावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे तर प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे लातूर विभाग संघचालक संजयजी अग्रवाल तसेच केंद्रीय कार्यकारिणी सदस्य संजय गुरव, स्थानिक समन्वय समिती कार्यवाह शैलेश कुलकर्णी, माध्यमिक शालेय समिती सदस्य नरेंद्र पाठक, केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा विद्यालयाचे उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते सरस्वती माता व भारत माता यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे संजयजी अग्रवाल असे म्हणाले, की खऱ्या अर्थाने देशाला गुणवंत विद्यार्थी देण्याचे कार्य शाळा करते. जो समाजात चांगले कार्य करतो, आपल्या ज्ञानाचा इतरांना फायदा करून देतो, तो गुणवंत असतो अशी त्यांनी गुणवंताची व्याख्या सांगितली. याप्रसंगी त्यांनी पंचपरिवर्तनातील कुटुंब प्रबोधन, पर्यावरण, नागरी कर्तव्य, समरसता व स्वदेशी या विषयी सखोल माहिती सांगितली. देशाला विश्वगुरुपदी नेण्यात आपला सहभाग असावा. संपूर्ण जगाला मार्गदर्शन करणारे भारताचे आदर्श नागरिक व्हा, असे आवाहन याप्रसंगी त्यांनी गुणवंत विद्यार्थ्यांना केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे यांनी विद्यार्थ्यांमधील उपजत ज्ञानाला उद्युक्त करण्याचे कार्य आपले संस्कार केंद्र तथा संस्था करते असे सांगितले. विद्यार्थी सर्वगुणसंपन्न, संस्कारक्षम व्हावा यासाठी शाळा सतत प्रयत्न करते. विद्यार्थी, शिक्षक, पालक व संस्थाचालक यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळेच विद्यार्थ्यांना यश मिळते, असे सांगून याप्रसंगी त्यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे, पालकांचे अभिनंदन केले व स्वातंत्र्य दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेतील गुणवंत, जवाहर नवोदय विद्यालयासाठी निवड झालेले विद्यार्थी व हिंदी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मंचावरील मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. या बक्षिसांचे वाचन प्रज्ञा नाईक यांनी केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक, परिचय व स्वागत क्षमा कुलकर्णी यांनी केले. याप्रसंगी त्यांनी वंदे मातरमचा अर्थ विशद केला. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन शैलजा देशमुख यांनी केले तर कांचन तोडकर यांच्या कल्याण मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली. याप्रसंगी विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.



या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पर्यवेक्षिका राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, अंजली निर्मळे, पर्यवेक्षक राम जोशी व धनंजय कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यासपूरक मंडळ प्रमुख तथा कार्यक्रम प्रमुख रेणुका गिरी, सहप्रमुख मीरा चामवाड, शिष्यवृत्ती विभाग प्रमुख प्रज्ञा नाईक, सहप्रमुख महादेव गोंदरकर व व्यवस्थेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## वैष्णवी हॉस्पिटल व न्यू होप टेस्ट ट्यूब बेबी सेंटरतर्फे मोफत वंधत्व निर्मूलन शिबिरात १०० हून अधिक रुग्णांना लाभ

**लातूर/प्रतिनिधी :** लोकनेते आदरणीय विलासराव देशमुख साहेब यांच्या १३ व्या स्मृतिदिनानिमित्त कै.वैजनाथ चन्नप्पा दरडे वैद्यकीय रिसर्च सेंटर, लातूर यांच्यावतीने आयोजित मोफत वंधत्व निर्मूलन व टेस्ट ट्यूब बेबी शिबिर गुरुवार, दि.१४ ऑगस्ट २०२५ रोजी वैष्णवी हॉस्पिटल व एंडोस्कोपी सेंटर, न्यू होप टेस्ट ट्यूब बेबी सेंटर येथे भव्य शिबिर पार पडले.



शिबिराचे उदघाटन माजी महापौर स्मिता खानापुरे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. तसेच संजू दरडे, गिरीजी तोडकर, प्रमोद कोरे, सामाजिक कार्यकर्ते संजय राजूळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या शिबिरात डॉ.राजेश दरडे, डॉ. सौ.वर्षा दरडे आणि डॉ.मनोज पर्वत यांनी महिलांच्या वंधत्व, गर्भधारणा यातील अडथळे व स्त्रीरोग विषयक तपासण्या करून मार्गदर्शन दिले. सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

विशेष म्हणजे, या शिबिरामध्ये ९२ हून अधिक रुग्णांना थेट लाभ मिळाला. अनेक जोडप्यांना मोफत तपासण्या, तज्ज्ञ सल्ला व उपचारांची दिशा मिळाली. यावेळी डॉ.राजेश दरडे यांनी रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा असल्याचे प्रतिपादन केले. तसेच टेस्ट ट्यूब बेबी प्रक्रियेबाबत समाजातील गैरसमज दूर करण्यासाठी वंधत्व विषयक अनेक महत्त्वाचे मुद्दे वर मार्गदर्शन केले. या उपक्रमाचे सर्व उपस्थित मान्यवरांनी मनापासून कौतुक केले. समाजातील गरजू रुग्णांसाठी अशा आरोग्यविषयक उपक्रमांची नितांत गरज असल्याचे मत व्यक्त करत, आयोजकांनी हा उपक्रम दरवर्षी सुरू ठेवण्याचा संकल्प व्यक्त केला.

## लोकनेते आदरणीय विलासरावजी देशमुख यांच्या स्मृतिदिनानिमित्त विनम्र अभिवादन



**लातूर/प्रतिनिधी :** मांजरा चॅरिटेबल ट्रस्ट द्वारा संचलित, श्रीमती सुशीलादेवी देशमुख महिला महाविद्यालयात महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय मंत्री, विकासरत्न आदरणीय विलासरावजी देशमुख साहेब यांच्या १३ व्या स्मृतिदिनानिमित्त प्राचार्य डॉ. आशा मुंडे संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्राचार्य डॉ. अजय पाटील व प्रा. डॉ. पी. एन. देशमुख

यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.आर.एस. कांबळे, डॉ. बालासाहेब भोसले, डॉ. नामदेव काटे, डॉ. मल्लिकार्जुन करजगी, श्री शिवशंकर गुंठे, श्री विठ्ठल देशमुख, श्री मारुती घाडगे यांच्यासह प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी , विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निलंगा येथे हर घर तिरंगा रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद

**निलंगा/प्रतिनिधी :** स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर निलंगा शहरात हर घर तिरंगा रॅलीचे भव्य आयोजन करण्यात आले. देशाचे प्रतीक असलेल्या राष्ट्रध्वजाचा गौरव साजरा करण्यासाठी,सीमेवरील जवानांचे मनोबल वाढवण्यासाठी, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी व नागरिकांच्या मनात राष्ट्रप्रेम वाढविण्यासाठी ही रॅली काढण्यात आली.

रॅलीमध्ये शहरातील विविध शाळांनी उत्साहाने सहभाग नोंदविला. तालुक्यातून आलेल्या विद्यार्थी, व्यापारी वर्ग, डॉक्टर, शिक्षक, अधिकारी व विविध सामाजिक घटकांनी देशाचा अभिमान ‘हर घर तिरंगा’ , भारत माता की जय,वंदे मातरम् या घोषणेतून राष्ट्र प्रेमाची भावना व्यक्त केली. रॅलीदरम्यान देशभक्तीपर घोषणा, तिरंग्याचे फडकते झेंडे आणि देशप्रेमाचा जोश शहरभर अनुभवायला मिळाला.

या भव्य रॅलीला माजी खासदार श्रीमती रूपाताई पाटील निलंगेकर,माजी मंत्री लोकप्रिय आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर, युवा नेते अरविंद पाटील निलंगेकर यांनी शुभेच्छा दिल्या. रॅली मध्ये भाजपा जिल्हा सरचिटणीस संजय दोरवे, जिल्हा उपाध्यक्ष शेषराव ममाळे,तालुकाध्यक्ष कुमोद लोभे, निलंगा कृषी उत्पन्न बाजार समिती सभापतीचे शिवकुमार चिंचनसुरे,औराद कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नरसिंग बिरादार,औराद मंडळ अध्यक्ष अनिल भंडारे, महिला आघाडीच्या संध्याताई पाटील,मोरे ताई,माजी जि.प. सदस्य डॉ.संतोष वाघमारे, डॉ मल्लिकार्जुन शंकद, माजी नगराध्यक्ष ड.विरभद्र स्वामी, माजी उपनगराध्यक्ष मनोज कोळ्ळे,अविराज पाटील,अरविंद पाटील,विनायक गोमसाळे,सुमीत इनानी,दयानंद कांबळे,नयन माने,नसीम खतीब,अमीर पटेल,नागेश तरंगे, उत्तम लासुणे उपस्थित होते.

रॅलीदरम्यान देशभक्ती पर गीतांनी वातावरण दुमदुमून शहरात उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले. पदयात्रेचे हुतात्मा स्मारक येथे राष्ट्रगीताने सांगता करण्यात आली.



## CHANGE OF NAME

I, Hamid Shaikh, resident of C/O Hamid Ibrahim Shaikh, Shivaji Nagar, Hadga Road, Opposite MSEB Substation, Nilanga, Dist. Latur (M.S.) – 413521, have changed my name from Hamid Shaikh to Hamid Ibrahim Shaikh.

Henceforth, I shall be known as Hamid Ibrahim Shaikh. The same name will be used by my children and family in all future records and references.

Old Name: Hamid Shaikh
New Name: Hamid Ibrahim Shaikh
ADDRESS:
HAMID IBRAHIM SHAIKH SHIVAJI NAGAR HADGA ROAD OPPOSITE MSEB SUBSTATION NILANGA DIST-LATUR (M.S.) 413521

### महिमा श्रीकृष्णाची

रे संभवामि युगे युगे
देतो विस्मय दाखला
सुखदायी जन्माष्टमी
दिधला शब्द राखला

मध्य रात्री काळरात्री
सूर्य प्रकाश फाकला
काळ पण सुखावला
अबीरगुलालेमाखला

कारागृहाच्या भिंतीने
गोपाळकालाचाखला
स्पर्श होता ममत्वाचा
गळूनपडल्या शृंखला

दार खुलले बंदिगृहाचे
काळही क्षणी रूकला
विश्वरक्षक ये जन्माला
सुरक्षारक्षक रे झुकला

दिशासज्ज स्वागताला
डोह यमुनेचा उसळला
दुग्ध जणू वाहे स्तनात
स्नेहमहापूर फेसाळला

पादस्पर्शे शांत उमाळा
प्रवाह तीव्र उच्छृंखला
वाटदिधली वसुदेवाला
वैभवप्राप्त हो चिखला

धन्य धन्य कान्हा जन्म
अगम्यलिला जगताला
जगण्याचे सार्थ सादर
अर्थ उमगला भूमितला

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

## संभाजी ब्रिगेड लातूर जिल्हा अध्यक्षपदी झुंजार नेतृत्व प्रमोद कदम यांची निवड

**निलंगा/प्रतिनिधी :** शाहू, फुले, आंबेडकर यांचा विचार समाजापुढे मांडून छत्रपती शिवरायांचा खरा आदर्श समाजापुढे मांडणाऱ्या संभाजी ब्रिगेड पार्टीच्या लातूर जिल्हा अध्यक्षपदी संभाजी ब्रिगेडचे झुंजार नेतृत्व शिवश्री प्रमोद कदम यांची निवड करण्यात आली आहे.

ही निवड पुणे येथील संभाजी ब्रिगेडच्या कार्यक्रमात प्रदेशाध्यक्ष मनोजदादा आखरे,प्रदेश महासचिव शिवश्री सौरभ पुरुषोत्तम खेडेकर, प्रदेश उपाध्यक्ष अभिमन्यू पवार, मुख्यप्रवक्ते गंगाधर बनबरे, उपाध्यक्ष अण्णासाहेब सावंत,विभागीय कार्याध्यक्ष वैजिनाथ जाधव,यांनी नियुक्तीपत्र देऊन ही निवड करण्यात आली. शिवश्री प्रमोद कदम हे निलंगा तालुका संभाजी ब्रिगेडची धुरा हातात सांभाळून सकल मराठा बहुजन समाजातील सर्वसामान्य नागरिकाचे प्रश्न उचलून धरून त्याला शासन दरबारी न्याय देण्यासाठी सतत लढले आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेऊन आज त्यांना जिल्हास्तरावर काम करण्याची संधी मिळाली या संधीचे सोने करून छत्रपती शिवरायांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून सर्वसामान्य नागरिकाच्या अडीअडचणी प्रशासनापर्यंत पोहोचण्यासाठी व संभाजी ब्रिगेडचे विचार समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचण्यासाठी, व न्याय मिळवून देण्यासाठी कटिबद्ध राहीन असे नूतन जिल्हाध्यक्ष प्रमोद कदम यांनी सांगितले



या निवडीचे लातूर जिल्ह्यासह सकल मराठा,बहुजन समाज बांधव व संभाजी ब्रिगेड पदाधिकारी करत आहेत.

## महापारेषणमध्ये ७९ वा भारतीय स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी अर्थात महापारेषणमध्ये ७९ वा भारतीय स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला.

सुरूवातीला महापारेषणच्या संचालक (वित्त) श्रीमती तृप्ती मुधोळकर यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. त्यानंतर त्यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी विनाअपघात सलग १० वर्षे सेवा बजावल्याबद्दल श्री. रोहिदास दळवी व श्री. शशिकांत महाडिक यांचा सत्कार करण्यात आला.






केंद्र शासनाच्या सूचनेनुसार हर घर तिरंगा अभियानाच्या अनुषंगाने महापारेषणमध्ये विविध उपक्रम राबविण्यात आले. महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांच्या नेतृत्वाखाली व अपर जिल्हाधिकारी तथा कार्यकारी संचालक (मानव संसाधन) यांच्या मार्गदर्शनाखाली चित्रकला व देशभक्तीपर गीतगायन स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये स्पर्धकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. याप्रसंगी संचालक (प्रकल्प) श्री. अविनाश निंबाळकर व अपर जिल्हाधिकारी तथा कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्रीमती सुचिता भिकाने यांच्या देशभक्तीपर विचारांनी वातावरण तिरंगामय झाले.

याप्रसंगी महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण, अपर जिल्हाधिकारी तथा कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्रीमती सुचिता भिकाने, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) श्री. कैलास कणसे, मुख्य अभियंता श्रीमती जुईली वाघ, श्री. सुनील सूर्यवंशी, श्री. महेंद्र वाळके, श्री. किशोर गरूड, मुख्य महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान) श्री. नागसेन वानखेडे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, मुख्य विधी सल्लागार श्री. विजय पाटील, महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्रीमती आरती रामटेके, अधीक्षक अभियंता श्री. एकनाथ ढेंगळे, श्री. सचिन खडगी, उपमहाव्यवस्थापक (मा.सं.) (प्र.) श्री. महेश सावंत, उपमुख्य दक्षता अधिकारी श्री. किशोर पाटील, श्री. प्रशांत गोरडे, शिष्टाचार अधिकारी श्री. सतिश जाधव, यांचेसह विविध अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेवटी अल्पोपहाराने कार्यक्रमाची सांगता झाली.

निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी–५२/२४–२६